॥ श्री ॥

# गीतागीत.

अथवा

## श्रीमद्भगवद्गीतेच्या तात्पर्यावर स्त्रियांकरितां ओंव्या.

हें पुस्तक

**मोरो सदाशिव मराठे, मु० राई**

यांनीं तयार करून

मुंबईंत विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध के

सन १९०

किंमत

REFBK-0000222

REFBK-0000222

ठाणें
५८
१२८४



# प्रस्तावना

…हेत. तेव्हां त्या
…ंची गोष्टच
…तका सुखाविषयीं पराकाष्ठेच।
…तर प्राण्यांस परमेश्वरानें आहार निद्रा।
…ठरवूनच दिलेलीं आहेत. पण मनुष्यांस इच्छेप्रमाणें …तीं वाढविण्याचीं साधनें दिलीं आहेत. त्यांत श्रेष्ठ सा…न आहे. तें जसें वळवितां येईल, त्याप्रमाणें सुख दुःख होणारें आहे. शारीरिक ताप कितीही होवो, मन आंवरून धरतां येईल तर तो तापही सुखात्मक करतां येईल, एवढी शक्ति त्यांत सांठविलेली आहे. भौतिक शास्त्रें दुःखपरिणामीं सुखें वाढवितात. पण अध्यात्म शास्त्र ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही सुखांस देणारें आहे आणि ह्मणूनच

**‘मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः’**

असें सांगितलें आहे.

ऐहिक सुखें साध्य करून घेण्यासही मन स्वाधीन

या पुस्तका संबंधीं सर्व प्रकारचे हक्क इ. स. १८६७ च्या
२५ व्या आक्टाप्रमाणें मालकानें आपलें स्वाधीन
राखिले आहेत.

ठाणें
१८०४

# प्रस्तावना.

...आहेत. तेव्हां त्या ...ंची गोष्टच

...ंतका सुखाविषयीं पराकाष्ठेच।
...ुष्येतर प्राण्यांस परमेश्वरानें आहार निद्रा।। ...ठरवूनच दिलेलीं आहेत. पण मनुष्यांस इच्छेप्रमाणें ...तीं वाढविण्याचीं साधनें दिलीं आहेत. त्यांत श्रेष्ठ सा...न आहे. तें जसें वळवितां येईल, त्याप्रमाणें सुख दुःख होणारें आहे. शारीरिक ताप कितीही होवो, मन आंवरून धरतां येईल तर तो तापही सुखात्मक करतां येईल, एवढी शक्ति त्यांत सांठविलेली आहे. भौतिक शास्त्रें दुःखपरिणामीं सुखें वाढवितात. पण अध्यात्म शास्त्र ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही सुखांस देणारें आहे आणि ह्मणूनच

**'मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयोः'**

असें सांगितलें आहे.

ऐहिक सुखें साध्य करून घेण्यासही मन स्वाधीन

ततत राहावें लागतें; मग अत्यंतिक करून घेण्यास केवढा प्रयत्न हवा बरें! ...त्र हवें आहे, पण उद्योग नको असें ह्मणून ...ां चालेल. या साठीं उभयलोकीं सुख पाहिजे असेल तर गीतेसारख्या ग्रंथांचें सतत अध्ययन, मनन व चिंतन हीं राखलीं पाहिजेत. तीं सुरू झालीं कीं,

**' नहि कल्याणकृत्कश्चित् दुर्गतिं तात गच्छति '**

ही शक्य सनद श्रीकृष्ण परमात्मा यानें देऊन ठेविली आहे; व त्याजवर भरंवसा असल्यामुळें यथाशक्ति व यथामति गीतेचा अर्थ मनांत ठसला जाण्याकरितां व दुसऱ्या कांहीं कारणांकरितां गीतेच्या अर्थावर ओंव्या केल्या आहेत. त्या ओंव्या स्त्रियांसाठीं ह्मणून केल्या असल्यामुळें त्यांची चालही स्त्रियांच्या चालीच्या ओंवी छंदाची ( पहिली माझी ओंवी इ० ) घेतली आहे श्री मद्भगवद्गीतेवर परमहंसादिकांनीं, साधुसंतांनीं मोठमोठ्या पंडितांनीं व विद्वान लोकांनीं, परधर्मीं

तत्वेच्छूंनीं सुद्धां टीका लिहिल्या आहेत. तेव्हां त्या मानानें विचार केला तर हल्लींच्या ओंव्यांची गोष्टच काय आहे! तथापि

**पर्वतशिरीं विहंगम वायुबलानें क्षणें सुखें उडती ॥**
**दुर्गम कंटकमयपथ आक्रमुनी नर हळू हळू चढती ॥**

हें लक्षांत वागवून मी आपली हौस पुरी केली आहे, इतकेंच.

ज्यांच्यासाठीं या ओंव्या लिहिल्या आहेत त्या माझ्या देशभगिनींस त्यांचा उपयोग होऊन इहपर-लोक सुखदायक करण्याच्या उपयोगीं पडोत.

स्त्रिया ओंव्या वगैरे ह्मणूं लागण्याच्यापूर्वी ईश्वर स्तुतिपर पहिली, दुसरी अशा कांहीं ओंव्या क्रमानें ह्मणत असतात तशा प्रकाकारच्या एकवीस ओंव्या तयार करून पुढें सादर ठेविल्या आहेत.

राई मि. ज्येष्ठ शु. ४
शुक्रवार शके १८२६

REFBK-0000222
REFBK-0000222

# प्राथमिक ओंव्या.

पहिली माझी ओवी । जगाच्या पालका ॥
रक्षी या बालका । देवराया ॥ १ ॥
दुसरी माझी ओवी । ब्रह्म आदिमाया ॥
त्यांनीं ही रमाया । सृष्टी केली ॥ २ ॥
तिसरी माझी ओवी । सत्व रज तम ॥
स्थावर जंगम । यांच्यामुळें ॥ ३ ॥
चवथी माझी ओवी । चारी वेद गाती ॥
परी तुझी गती । नकळे देवा ॥ ४ ॥
पांचवी माझी ओवी । माझे पंचप्राण ॥
तूझीया वरून । ओवाळीतें ॥ ५ ॥
सहावी माझी ओवी । षट्शास्त्रांच्या रीति ॥
दाखवूनी गती । जनां दीली ॥ ६ ॥
सातवी माझी ओवी । सातवीती काया ॥
सद्गुरू अर्चाया । सिद्ध ठेवूं ॥ ७ ॥

आठवी माझी ओवी । अष्ट दिशांकडे ॥
जीकडे तीकडे । राम माझा ॥ ८ ॥
नववी माझी ओवी । पृथीवी नवखंड ॥
प्राण्यांसी उदंड । जागा केली ॥ ९ ॥
दहावी माझी ओवी । दश अवतारा ॥
दुष्टांच्या संहारा । अवतरतो ॥ १० ॥
अक्रावी माझी ओवी । एकादश रुद्र ॥
करावया भद्र । सज्जनांचें ॥ ११ ॥
बारावी माझी ओवी । बारा आदित्यांसी ॥
प्रेमें नित्य त्यांसी । नमन करूं ॥ १२ ॥
तेरावी माझी ओवी । तांबुल तेरा गुणी ॥
प्रभूसी अर्पूनी । वर मागूं ॥ १३ ॥
चौदावी माझी ओवी । गाऊं अनंतासी ॥
सर्वदा संतांसी । सांभाळीतो ॥ १४ ॥
पंध्रावी माझी ओवी । पंध्रा तीर्थींचें पाळण ॥
पापांची बोळवण । होय तेणें ॥ १५ ॥

सोळावी माझी ओवी । चंद्रमा सोळा कळा ॥
अपर्णाधव भोळा । माथां धरी ॥ १६ ॥
सत्रावी माझी ओवी । सत्रावी कामधेनु ॥
महिमा काय वानूं । मोक्षदानी ॥ १७ ॥
अठरावी माझी ओवी । गीता ग्रंथ थोर ॥
सुखाचे जलधर । ओथंबले ॥ १८ ॥
एकोणीसावी माझी ओवी। धरीतां अतिधृति॥
वैकुंठीचा पती । जवळी होय ॥ १९ ॥
वीसावी माझी ओवी । विसावा रामनामीं ॥
शीकवीं मना मी । रात्रंदीस ॥ २० ॥
एकवीसावी माझी ओवी । विसावा घेऊं येथें॥
राम जेथें तेथें । आठवावा ॥ २१ ॥

## समाप्त.

# अनुक्रमणिका.


पार्थाचा विषाद । प्रथमाध्यायांत ॥
असे दुसऱ्यांत । सांख्ययोग ॥ १ ॥
कर्मयोग असे । स्पष्ट तिसऱ्यांत ॥
देह तों संगत । असे ज्याची ॥ २ ॥
कर्म ब्रह्मार्पण । योग चवथ्यांत ॥
असे पांचव्यांत । कर्मन्यास ॥ ३ ॥
अध्यात्मयोग तो । असे सहाव्यांत ॥
असे सातव्यांत । ज्ञानयोग ॥ ४ ॥
अक्षर ब्रह्म हा । योग आठव्यांत ॥
योग नवव्यांत । राजविद्या ॥ ५ ॥
विभूतीयोग तो । असे दहाव्यांत ॥
दावीलें अक्रांत । विश्वरूप ॥ ६ ॥
भक्तियोग पूर्ण । असे बाराव्यांत ॥
साधतां तो देत । मोक्षपद ॥ ७ ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञ हा । तेराव्यांत योग ॥

गुणत्रय हा भाग । चौदाव्यांत ॥ ८ ॥
पुरुषोत्तमयोग । असे पंध्राव्यांत ॥
दैवासुर संपत् । सोळाव्यांत ॥ ९ ॥
श्रद्धात्रययोग । असे सत्राव्यांत ॥
योग अठराव्यांत । तो सन्यास ॥ १० ।

## ॥ गीता माहात्म्य ॥

पृथ्वी बोले देवा । तुझी शुद्ध भक्ति ॥
होई कोणे रीती । सांगावीजी ॥ १ ॥
जेथें गीताभ्यास । संतत नांदतो ॥
कर्में न पावतो । बंध तेथें ॥ २ ॥
प्रेमें करी गीता । ध्यान निरंतर ॥
पापी जरी नर । शुद्धी पावे ॥ ३ ॥
जेथें गीतापाठ । तेथें सर्व तीर्थें ॥
मीही तेथें वर्तें । वसुंधरे ॥ ४ ॥
अठरा अध्याय । गीतापाठ करी ॥

निश्चलता धरी । मन तेणें ॥ ५ ॥
नित्य अर्धपाठ । करीतां प्रीतीनें ॥
पुण्य गोदानानें । तें लाभतें ॥ ६ ॥
नित्य षडाध्याय । करीतां पठण ॥
रुद्रलोक मान । मीळे त्यासी ॥ ७ ॥
अल्प श्लोकपाठ । कोणी नित्य करी ॥
सर्व साध्य तरी । इहपर ॥ ८ ॥
अंतकाळीं होई । 'गीता' हा उच्चार ॥
तयाचा संसार । संपतसे ॥ ९ ॥
गीतार्थाचा ध्यास । जयाच्या अंतरीं ॥
त्याच्या येरझारी । नष्ट होती ॥ १० ॥
गीतेचें माहात्म्य । पाठासवें गावें ॥
दुर्लभ तें पावे । मोक्ष सुख ॥ ११
शाश्वत माहात्म्य । गीतेचें कथीलें ॥
सूत ह्मणे भलें । गात जावें ॥ १२ ॥



॥ श्री ॥

# गीता गीत

अथवा

## गीतेच्या तात्पर्यावर स्त्रियांसाठीं ओंव्या

### अध्याय १ ला.

जननी जनक। वंदूं धन्य धन्य ॥
उपमेसी अन्य। कांहीं नाहीं ॥ १ ॥
प्रेमाचा आगर। सौख्याचा सागर ॥
त्रैलोक्याचें सार। वंदूं माता ॥ २ ॥
विघ्नांचा नाशक। बुद्धिप्रकाशक ॥
ऐसा वंदूं एक। गजानन ॥ ३ ॥
वाणीची देवता। वंदूं सरस्वती ॥
कृपेनेंच होती। मूर्ख ज्ञानी ॥ ४ ॥
सावधान ऐका। जना उद्धारक ॥

कल्याण कारक । गीता ग्रंथ ॥ ५ ॥
इहपर लोक । साधाया सरस ॥
भारताचा रस । गीता ग्रंथ ॥ ६ ॥
चातुर्यास ज्ञान । तत्वार्थासी गोडी ॥
योग्यतेसी प्रौढी । गीता ग्रंथीं ॥ ७ ॥
आतां अज्ञपणें । सांगूं काय फार ॥
उत्तमासी थार । गीता ग्रंथ ॥ ८ ॥
शाश्वत धर्माचें । लाडकें अपत्य ॥
गीता होय सत्य । प्रेमस्थान ॥ ९ ॥
भारती युद्ध हें । समुद्र मंथन ॥
निघालें तेथून । गीतामृत ॥ १० ॥
ह्मणूनियां प्रेमें । गीतागीत गाऊं ॥
आहे हें तगाऊ । अखंडीत ॥ ११ ॥
संजयासी पुसे । धृतराष्ट्र अंध ॥
सत्यज्ञानगंध । नसे ज्यासी ॥ १२ ॥
कौरव पांडव । धर्मक्षेत्रीं आले ॥

पुढें काय झालें । सांग मला ॥ १३ ॥
सांगत संजय । तेथें जें घडत ॥
जयासी कळत । त्रिकाळींचें ॥ १४ ॥
द्रोणासी येऊन । वदे दुर्योधन ॥
सामान्य योध न । पांडवांचें ॥ १५ ॥
भीमार्जून शूर । द्रूपदादि राजे ॥
तयांनीं विराजे । शत्रू सैन्य ॥ १६ ॥
धृष्टद्युम्नें केली । व्यूहाची रचना ॥
ती भव्यलोचना । पहा पहा ॥ १७ ॥
महारथी वीर । शोभे अभिमन्य ॥
नव्हे हा सामान्य । रणधीर ॥ १८ ॥
अनेक देशांचे । राजयांचे पुंज ॥
करावया झुंज । आले पहा ॥ १९ ॥
आपुल्याही दळीं । थोर थोर वीर ॥
वर्णू कोठवर । थोडे सांगूं ॥ २० ॥
पितामह थोर । धैर्याचा सागर ॥

तैसा कर्णवीर । कृपाचार्य ॥ २१ ॥
अश्वत्थामा ज्याचा । धाक कृतांतासी ॥
झुंजाया तयासी । कोण शके ॥ २२ ॥
वीरश्रेष्ठ आले । शस्त्रास्त्रीं प्रवीण ॥
द्यावयासी प्राण । माझ्यासाठीं ॥ २३ ॥
यावरी वीरांसी । वीरश्री यायाला ॥
सिंहनाद केला । पितामहें ॥ २४ ॥
फुंकोनीयां शंख । सेना सिद्ध केली ॥
वाद्येंही लागलीं । वाजावया ॥ २५ ॥
पार्थें देवदत्त । शंख फुंकीयला ॥
हरीनें धरीला । पांचजन्य ॥ २६ ॥
भैरव रव तो । भरोनीयां गेला ॥
हृद्घट भंगला । कौरवांचा ॥ २७ ॥
सिद्धधनु पार्थ । कृष्णाप्रती बोले ॥
पाहूं कोण आले । युद्धालागीं ॥ २८ ॥
वंद्य गुरु मित्र । बांधव सोहीरे ॥

५ 222
दा. क.

पाहोनीयां विरे । सव्यसाची ॥ २९ ॥
मोहें व्यापूनी तो । ह्मणे कृष्णराया ॥
युद्ध मी कराया । सिद्ध झालों ॥ ३० ॥
झगडाया आले । माझे गणगोत ॥
पाहोनी कंपीत । देह होतो ॥ ३१ ॥
हात पाय माझे । गळालेरे पहा ॥
सर्वांगाचा दहा । होतो आहे ॥ ३२ ॥
गांडीव गळतें । हृदय चळतें ॥
शरीर जळतें । कैसें साहूं ॥ ३३ ॥
मारूनीयां यांसी । करूं काय राज्य ॥
देवांसम पूज्य । आह्मांसी जे ॥ ३४ ॥
मारूनीयां यांसी । करूं कुलक्षय ॥
नरक अक्षय । सिद्ध मग ॥ ३५ ॥
होई कुलहानी । नष्ट कुलधर्म ॥
तुज सारें वर्म । ठावें देवा ॥ ३६ ॥
करीतील स्त्रिया । मग व्यभीचार ॥

जाईल आचार । लोपोनीयां ॥ ३७ ॥
यापरी अर्जून । मोहें विद्ध झाला ॥
कार्यक्षम केला । श्रीकृष्णानें ॥ ३८ ॥
ऐसें हें पहिल्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ३९ ॥
कृपाघन पार्थ—सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ४० ॥

---

## अध्याय २ रा.

कृ०-कैसें या प्रसंगीं । अधैर्य धरीसी ॥
दुःख तूं करीसी । वृथा कां रे ॥ १ ॥
क्षत्रीयांसी रण । हाच बा सांगाती ॥
थोर थोर गाती । भूलसी कां ॥ २ ॥
शोका न जें योग्य । त्यातें तूं शोचीसी ॥
भाषण करीसी । पंडीतसे ॥ ३ ॥

बा बाल्य तारुण्य । वृद्धदशा देहा ॥
चैतन्यासी न हा । भेद कांहीं ॥ ४ ॥
इंद्रियां न होई । वश यां निर्दाळी ॥
मग नये पाळी । संसाराची ॥ ५ ॥
आत्मासत्यनित्य । हें जरी चिंतीसी ॥
मग न करीसी । शोक ऐसा ॥ ६ ॥
वाटे कीं मारीन । तेव्हांच मरती ॥
येरव्ही राहती । अमर हे ? ॥ ७ ॥
शस्त्रानें न तुटे । जलानें न भीजे ॥
अग्नीनें न भाजे । आत्मा नित्य ॥ ८ ॥
नभ जल तेज । वायु वसुंधरा ॥
व्यक्तमध्यें जरा । अंतीं नाश ॥ ९ ॥
दिसे भासे यांसी । असे जें कारण ॥
जनन मरण । त्यासी नोहे ॥ १० ॥
ठेवोनी हें मनीं । हातीं घेई चाप ॥
दावी प्रताप । रणधीरा ॥ ११ ॥

क्षत्रीय कर्तव्य । असतां हें युद्ध ॥
तयासी विरुद्ध । नको होऊं ॥ १२ ॥
कर्तव्य चूकतां । सर्वस्वासी हानी ॥
धरूनी हें मनीं । भीडे रणीं ॥ १३ ॥
कर्तव्य करीतां । लाभ हानी दोंनी ॥
सुखदुःखांचेनी । मोहूं नको ॥ १४ ॥
सुख दुःख सम । मानणें जें चित्तीं ॥
तयास ह्मणती । योग पार्था ॥ १५ ॥
सकाम कर्मानें । स्वर्गादिक मिळे ॥
निष्कामानें वळे । मोक्ष मार्गा ॥ १६ ॥
सुख--दुःखीं सदा । राहे समशील ॥
सहजीं होशील । स्थिर बुद्धी ॥ १७ ॥
टाकोनी संदेह । त्यागी कर्मफल ॥
मग तूं होशील । स्थिर बुद्धी ॥ १८ ॥
स्थीर बुद्धीचेनी । वैराग्य बाणतां ॥
आत्मतत्व हातां । येई पार्था ॥ १९ ॥

अ०–कैसें होई स्थीर। बुद्धीचें बोधन ॥
पुसत अर्जून। हृषीकेशा ॥ २० ॥
कृ०–इंद्रियां सहित। मनासी आंवरी ॥
हेतू मजवरी। तो स्थीरधी ॥ २१ ॥
शुभानें न फुगे। अशुभें न खंगे ॥
आत्मारामीं रंगे। तो स्थीरधी ॥ २२ ॥
पार्था अर्थासी जें। निस्पृह वागणें ॥
तयासी ह्मणणें। ब्राह्मीस्थिती ॥ २३ ॥
ऐसा हा ज्ञानाचा। धर्म थोर पार्था ॥
ह्मणूनीया अर्था। व्यर्थ मानी ॥ २४ ॥
ऐसें हें दुसऱ्या। आध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर। पुढें ऐका ॥ २५ ॥
कृपाघन पार्थ–सखा नारायण ॥
तयासी शरण। मयूर हा ॥ २६ ॥

---

## अध्याय ३ रा.

अ०—कर्माहूनी ज्ञान । वरिष्ठ ह्मणसी ॥
मग कां योजीसी । मज युद्धीं ॥ १ ॥

कृ०—पूर्वाभ्यासानें जो । चित्तशुद्ध त्याला ॥
ज्ञानमार्ग भला । होत असे ॥ २ ॥
चित्त शुद्धीसाठीं । राखोनी स्वधर्म ॥
निष्कामसें कर्म । आधीं व्हावें ॥ ३ ॥
ऐशा कर्में ज्ञान । उपजतां चित्तीं ॥
ज्ञानयोगें होती । मग पूर्ण ॥ ४ ॥
बोलणें चालणें । उगें झोंप घेणें ॥
कांहीं न करणें । हेंही कर्म ॥ ५ ॥
कर्म न करणें । हें तो घडेचीना ॥
जोंवरी होईना । देह नष्ट ॥ ६ ॥
कर्मानें जनन । कर्मानें मरण ॥
कर्माचें जनन । पुन्हा कर्में ॥ ७ ॥

११ काव्य

मुमुक्षूसीं योग्य । कर्मफल त्याग ॥
अज्ञान्याचा मार्ग । ऐक आतां ॥ ८ ॥
ब्रह्मदेवें आधीं । प्रजा निर्मीयेल्या ॥
सांगूनीया दिल्या । यज्ञ क्रिया ॥ ९ ॥
नित्य यज्ञ क्रिया । करूनी शेषान्न ॥
भक्षीतां प्रसन्न । देव होती ॥ १० ॥
कर्मोद्भव यज्ञ । यज्ञानें पर्जन्य ॥
पर्जन्यानें अन्न । अन्नें प्राणी ॥ ११ ॥
वर्णाश्रमयुक्त । यज्ञ जो न करी ॥
तया खरोखरी । अधोगती ॥ १२ ॥
कामना रहीत । कर्मैं तू आचरी ॥
समर्पण करी । मज पार्था ॥ १३ ॥
थोर लोक जैसे । वागती त्या रीती ॥
पाहोनी वागती । सर्व लोक ॥ १४ ॥
बुद्धीवंतें योग्य । कर्मैं आचरून ॥
द्यावा दाखवन । मार्ग लोकां ॥ १५ ॥

मिळावेंसें । नाहीं जगीं कांहीं ॥
तरी कर्म नाहीं । मी टाकीलें ॥ १६ ॥
मंदबुद्धी कर्मी । आसक्ति धरीती ॥
तीवीणें करीती । ज्ञानी कर्में ॥ १८ ॥
देहेंद्रियें मन । यांनीं कर्में होती ॥
कर्ता मी ही भ्रांति । उघडीच ॥ १८ ॥
शांत चित्तें मज । कर्मार्पण करी ॥
निभ्रांत तूं धरी । शस्त्र हातीं ॥ १९ ॥
परधर्माहूनी । स्वधर्म उत्तम ॥
त्यांतही अधम । जरी असे ॥ २० ॥
मरणही बरें । स्वधर्माचरणीं ॥
परधर्माचेनी । थोर भय ॥ २१ ॥
अ०—इच्छा नसतांही । पाप कर्में होती ॥
कैसें हें घडे ती । रीति सांगे ॥ २२ ॥
कृ०—काम हाच वैरी । मुख्य या कारण ॥
जीव कर्म ऋण । फेडवी तो ॥ २३ ॥

समस्त जीवांची । हाच रक्षा करी ॥
तरीही न वरी । तृप्ती कधीं ॥ २४ ॥
मळानें आरसा । धूमानें पावक ॥
काम हा बाधक । ज्ञाना तैसा ॥ २५ ॥
रंका जरी राज्य । मिळे नव्हे तुष्ट ॥
भोगें काम पुष्ट । अधिक होतो ॥ २६ ॥
इच्छाभंग होतां । क्रोधरूप काम ॥
होवोनी लगाम । फीरवी तो ॥ २७ ॥
मोक्ष मार्गाचे हे । मस्त नित्य वैरी ॥
काम हा पुढारी मारी पार्था ॥ २८ ॥
मन–बुद्धीहूनी । पर आत्माराम ॥
जाणतां हा काम । मेला मानी ॥ २९ ॥
ऐसें हें तिसऱ्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ३० ॥
कृपाघन पार्थ—सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ३१ ॥

## अध्याय ४ था.

कृ०-कल्याण कारक । हा विवस्वानाला ॥
पूर्वीच कथीला । योग पार्था ॥ १ ॥
परंपरा गेली । योगाची बुडोनी ॥
प्रीय तूं ह्मणोनी । सांगें तूज ॥ २ ॥
अ०-पुरातनासी तूं । उपदेश केला ॥
कळेना हा मला । बोल तुझा ॥ ३ ॥
कृ०-तुझेमाझे झाले । जन्म असंख्यात ॥
हें तूं न जाणत । जाणतों मी ॥ ४ ॥
धर्म क्षीण होतां । अवतार घेतों ॥
साधूंसी रक्षीतों । वेळोवेळीं ॥ ५ ॥
मज्जन्मासी जाणें । ज्यासी माझी प्रीति ॥
ज्ञानतपें होती । मुक्तची ते ॥ ६ ॥
जे मला भजती । जैशा जैशा रीती ॥
लाभादिक होती । तैसे त्यांसी ॥ ७ ॥

गुण--कर्मानुरोधें । चारी वर्ण केले ॥
तरी न शीवलें । कर्म मला ॥ ८ ॥
कर्म फळावरी । इच्छा मी न ठेवीं ॥
तैसी त्वां धरावी । बुद्धी पार्था ॥ ९ ॥
कर्म होय कैसें । अकर्म तें काय ॥
पडे हा संशय । जाणत्याही ॥ १० ॥
अकर्म विकर्म । कर्म सांगूं आतां ॥
जाणूनी वागतां । मुक्त होसी ॥ ११ ॥
वेद विहित जें जें । ह्मणवी तें कर्म ॥
तें जाण विकर्म । वेदें निंद्य ॥ १२ ॥
वेद विहित जें तें । टाळणें अकर्म ॥
समजोनी वर्म । वागे पार्था ॥ १६ ॥
फळेच्छा रहीत । दूर मीपणासी ॥
ऐसा तो निर्दोषी । कर्मकर्ता ॥ १४ ॥
चित्ताचा संयम । अंतरीं निष्काम ॥
सुख--दुःखीं सम । मुक्तची तो ॥ १५ ॥

मिळे त्यांत तुष्ट । द्वंद्वासी न मानी ॥
ऐसा होय ज्ञानी । बंधमुक्त ॥ १६ ॥
यज्ञासाठीं कर्में । कामादि जिंकूनी ॥
होती ही सरणी । दोषें मुक्त ॥ १७ ॥
नानारीतींनीं जे । यज्ञ आचरीती ॥
त्यांत कांहीं रीती । तूज सांगूं ॥ १८ ॥
कोणी द्रव्ययज्ञ । कोणी तपयज्ञ ॥
योगरूपयज्ञ । कोणी करी ॥ १९ ॥
यज्ञपात्रें अग्नी । यज्ञद्रव्य ब्रह्म ॥
मानी तोही ब्रह्म । स्वयें होय ॥ २० ॥
कर्मयोगी कोणी । देवतांच्या साठीं ॥
यज्ञ परिपाठी । राखीताती ॥ २१ ॥
कर्णेंद्रियादिक । संयम अग्नींत ॥
अर्पूनी करीत । कोणी यज्ञ ॥ २२ ॥
विषय हें द्रव्य । इंद्रिय कुंडांत ॥
अर्पूनी मानीत । तोच यज्ञ ॥ २३ ॥

कोणी करी दान । तप आचरण ॥
वेदांचें पठण । कोणी करी ॥ २४ ॥
प्राण निरोधन । इंद्रिय दमन ॥
हाच कोणी जन । यज्ञ करी ॥ २५ ॥
प्राणांत अपान । अपानांत व्यान ॥
ऐसें समर्पून । यज्ञ करी ॥ २६ ॥
यज्ञांते जाणते । यज्ञ आचरूनी ॥
पातकां पासूनी । मुक्त होती ॥ २७ ॥
द्रव्ययज्ञाहूनी । ज्ञानयज्ञ थोर ॥
कर्मांचा संहार । शेवीं ज्ञानें ॥ २८ ॥
ज्ञात्यांसी वंदन । नम्रपणें सेवा ॥
करीतां ते ठेवा । देती तूतें ॥ २९ ॥
त्या ज्ञानोपदेशें । नष्टमोह होसी ॥
तुझा तूंच होसी । चराचर ॥ ३० ॥
पावक लांकडें । ओलीं सुकीं जाळी ॥
तैसी कर्महोळी । होय ज्ञानें ॥ ३१ ॥

शुद्धवस्तू जगीं । ज्ञानासम नसे ॥
संचितही नासे । ज्ञानयोगें ॥ ३२ ॥
श्रद्धा ज्याच्या चित्तीं । इंद्रिय संयम ॥
त्यासीच परम । शांती लाभे ॥ ३३ ॥
ज्ञानहीन जन । श्रद्धेचा ज्या धाक ॥
इह-परलोक । त्यास कैंचा ॥ ३४ ॥
अज्ञानमूलक । संशय तूं टाकी ॥
युद्धकर्मी ठाकी । प्रिय सख्या ॥ ३५ ॥
ऐसें हें चवथ्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनियां धीर । पुढें ऐका ॥ ३६ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ३७ ॥

---

## अध्याय ५ वा.

अ०-कर्म आणि ज्ञान । दोहोंसी वानीसी ॥
श्रेयस्कर मसी । तेंच सांगे ॥ १ ॥

कृ०—कर्मन्यासाहूनी । कर्मयोग थोर ॥
ह्मणूनी आचर । कर्मे पार्था ॥ २ ॥
राग आणि द्वेष । ज्याच्या न चित्तांत ॥
सहजीं तो होत । बंधमुक्त ॥ ३ ॥
न्यास आणि योग । सम पंडितासी ॥
अज्ञानी तयासी । भिन्न मानी ॥ ४ ॥
कर्मयोगाविणें । संन्यास न घडे ॥
संन्यासानें पुढें । मोक्ष सिद्ध ॥ ५ ॥
देहादिकांचाही । आत्मा मी हें जाणें ॥
तो कर्माचरणें । निर्लेपची ॥ ६ ॥
पाहणें ऐकणें । स्पर्श खाणें पीणें ॥
इंद्रियांचें जाणें । तत्वज्ञानी ॥ ७ ॥
ऐसे कर्मयोगी । जाणून चित्तांत ॥
लोकीं विचरत । अलिप्तची ॥ ८ ॥
कर्म करुनि होतो । ब्रह्मार्पणें तृप्त ॥
तो जैसें अलिप्त । पद्मजळीं ॥ ९ ॥

आत्मशुद्धीसाठीं । योगी कर्में करी ॥
इच्छा फळावरी । न ठेवितां ॥ १० ॥
कर्मफलत्यागें । योगी शांती पावे ॥
संसारीं रावावें । इतरांनीं ॥ ११ ॥
नवद्वार देह । नगरांत वसे ॥
सुखें कर्मन्यासें । आत्मज्ञानी ॥ १२ ॥
ईश्वर न करी । कर्मफळ कर्म ॥
स्वभावाचा धर्म । त्यासी फळे ॥ १३ ॥
ईश्वर कोणाचें । पाप पुण्य नेघे ॥
आज्ञानाच्या ओघें । भ्रमे जीव ॥ १४ ॥
अज्ञान नासतां । आत्मरूप कळे ॥
सूर्यानें ऊजळे । जैसें जग ॥ १५ ॥
भगवंतीं मन । निष्ठा भगवंतीं ॥
सहजीं तूटती । बंध त्याचे ॥ १६ ॥
मांसाशनी जीव । वृष हत्ती श्वान ॥
विप्रही समान । ज्ञानीयासी ॥ १७ ॥

२२

ऐसी ज्याच्या मनीं । समता बाणली ॥
तयानें साधीली । मुक्ती सुखें ॥ १८ ॥
दृश्यादिकांवरी । धरूनी विरक्ती ॥
अंतरीं आसक्ती । ज्ञानीयाची ॥ १९ ॥
इंद्रियांचे भोग । दुःखासी कारण ॥
ज्ञानी हें जाणून । वागतसे ॥ २० ॥
कामक्रोधानें जो । विकार न पावे ॥
योगी तो सुखावे । आत्मारामीं ॥ २१ ॥
अंतरांत सुख । विश्रांती विज्ञान ॥
पावेतो निर्वाण । मोक्षपद ॥ २२ ॥
कर्मक्षय होतां । द्वैत अंतरतें ॥
मन विरमतें । मनामाजी ॥ २३ ॥
अनुभवी संत । प्राणी हितकारी ॥
असती देहधारी । ब्रह्मरूप ॥ २४ ॥
कर्मासक्ती गेली । कामादी सांडीले ॥
आत्मत्व कळलें । मुक्तची तो ॥ २५ ॥

बाह्यविषयांसी । धरोनीयां दूरी ॥
मनातें आवरी । मुक्तची तो ॥ २६ ॥
प्राणापान सम । दृष्टी भ्रूमध्यांत ॥
कामविवर्जित । मुक्तची तो ॥ २७ ॥
तप यज्ञ भोक्ता । देवदेवा मातें ॥
जाणें भूतात्म्यातें । मुक्तची तो ॥ २८ ॥
ऐसें हें पांचव्या । आध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ २९ ॥
कृपाघन पार्थ–सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ३० ॥

---

## अध्याय ६ वा.

काम्य कर्मे टाकी । आचरे विहित ॥
ऐसा योगी होत । संन्यासीही ॥ १ ॥
पार्था संन्यासही । योग ह्मणवीतो ॥
फलाशा असे तो । नव्हे योगी ॥ २ ॥

योग इच्छा ज्यासी । कर्म साह्यभूत ॥
योगारूढा होत । शम साह्य ॥ ३ ॥
आपणा आपण । उद्धरावें जनें ॥
शत्रूमित्र मनें । आपणची ॥ ४ ॥
आत्मयोगी बुद्धि । मना वळवीते ॥
येर ते सेवीते । विषय विष ॥ ५ ॥
मनोजय होतां । होत रूपीं स्थीर ॥
द्वंद्वानें तो नर । हार नव्हे ॥ ६ ॥
इंद्रियें जिंकीलीं । माती सोनें सम ॥
मानी, तया नाम । योगयुक्त ॥ ७ ॥
साधू पापी शत्रू । मित्र उदासीन ॥
यांसी जो समान । तोच श्रेष्ठ ॥ ८ ॥
चित्त देह यांचा । संयम करून ॥
एकांतीं बसून । स्थीर व्हावें ॥ ९ ॥
दर्भ मृग चर्म । स्वच्छ वस्त्र वरी ॥
आसनाची परी । ऐसी आहे ॥ १० ॥

मान देह सम । निश्चळ ठेवून ॥
नांसाग्र लक्षून ॥ स्थिर व्हावें ॥ ११ ॥
येणें रीती माझें । स्मरण करीतां ॥
होतसे स्थीरता । माझ्या रूपीं ॥ १२ ॥
आहार विहार । योग्य निद्रा जाग ॥
साधी तया योग । सुखदायक ॥ १३ ॥
दीप जैसा स्थीर । निर्वात जागेंत ॥
योगी तैसें चित्त । स्थीर करी ॥ १४ ॥
योगाभ्यासें चित्त । मागें मुरडीतां ॥
पावे संतुष्टता । आत्मरूपीं ॥ १५ ॥
इंद्रियांस न जें । ग्राह्य आत्मसुख ॥
तयाचा हरीख । बुद्धी जाणें ॥ १६ ॥
हळू हळू तुवां । चित्त वळवावें ॥
अंतरीं लावावें । आत्मरूपीं ॥ १७ ॥
मन जेथें जाई । तेथोनी ओढावें ॥
अंतरीं लावावें । पुन्हा पुन्हा ॥ १८ ॥

या रीतीनें मन । संकल्प सांडील ॥
सांडीता होईल । अंतर्मुख ॥ १९ ॥
सर्व सौख्यनिधी । बुद्धीनें जाणतां ॥
बळेंही ओढीतां । मागें नये ॥ २० ॥
ऐसा सिद्ध योगी । संकल्पातें त्यागी ॥
आत्मसुख भोगी । नित्य मोदें ॥ २१ ॥
माझ्या ठायीं चित्त । जगीं मी ज्या दिसें ॥
त्यासी मसी नसे । वेगळीक ॥ २२ ॥
सुख दुःख मला । तैसें इतराला ॥
मानी जो तो मला । योगी मान्य ॥ २३ ॥
अ०—अत्यंत चंचळ । मन जोरावर ।
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २४ ॥
क्षणीं स्वर्ग मृत्यु । पाताळीं वावर ॥
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २४ ॥
एका ठायीं वास । केवढा जोजार ॥
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २६ ॥

मान देह सम । निश्चळ ठेवून ॥
नासाग्र लक्षून ॥ स्थिर व्हावें ॥ ११ ॥
येणें रीती माझें । स्मरण करीतां ॥
होतसे स्थीरता । माझ्या रूपीं ॥ १२ ॥
आहार विहार । योग्य निद्रा जाग ॥
साधी तया योग । सुखदायक ॥ १३ ॥
दीप जैसा स्थीर । निर्वात जागेंत ॥
योगी तैसें चित्त । स्थीर करी ॥ १४ ॥
योगाभ्यासें चित्त । मागें मुरडीतां ॥
पावे संतुष्टता । आत्मरूपीं ॥ १५ ॥
इंद्रियांस न जें । ग्राह्य आत्मसुख ॥
तयाचा हरीख । बुद्धी जाणें ॥ १६ ॥
हळू हळू तुवां । चित्त वळवावें ॥
अंतरीं लावावें । आत्मरूपीं ॥ १७ ॥
मन जेथें जाई । तेथोनी ओढावें ॥
अंतरीं लावावें । पुन्हा पुन्हा ॥ १८ ॥

या रीतीनें मन । संकल्प सांडील ॥
सांडीता होईल । अंतर्मुख ॥ १९ ॥
सर्व सौख्यनिधी । बुद्धीनें जाणतां ॥
बळेंही ओढीतां । मागें नये ॥ २० ॥
ऐसा सिद्ध योगी । संकल्पातें त्यागी ॥
आत्मसुख भोगी । नित्य मोदें ॥ २१ ॥
माझ्या ठायीं चित्त । जगीं मी ज्या दिसें ॥
त्यासी मसी नसे । वेगळीक ॥ २२ ॥
सुख दुःख मला । तैसें इतराला ॥
मानी जो तो मला । योगी मान्य ॥ २३ ॥
अ०–अत्यंत चंचळ । मन जोरावर ।
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २४ ॥
क्षणीं स्वर्ग मृत्यु । पाताळीं वावर ॥
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २४ ॥
एका ठायीं वास । केवढा जोजार ॥
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २६ ॥

आंवरीता मन । उसळतें वर ॥
तयाचा आंवर । कैसा होई ॥ २७ ॥
पुसत अर्जून । सांगे भगवान ॥
मनाचें मथन । कैंवी होतें ॥ २८ ॥
कृ०—अभ्यास वैराग्य । हे दोन उपाय ॥
यांनीं मन गाय । होय पार्था ॥ २९ ॥
जोंवरी होणार । नाहीं मनोजय ।
तोंवरी न होय । योग त्यासी ॥ ३० ॥
अ०—श्रद्धेनें अभ्यास । मांडी तों मरण ॥
येई मग कोण । गती त्यासी? ॥ ३१ ॥
कृ०—मोक्षपुरीच्या जो । योगमार्गा लागे ॥
सांग कोण्या जागे । जाई बरें ? ॥ ३२ ॥
पुण्यंवत आणि । योगभ्रष्ट जन ॥
पुण्यलोकीं स्थान । पावतसे ॥ ३३ ॥
दीर्घकाळ सुख । भोगून माघारी ॥
शुद्धश्रीमान्‌घरीं । जन्म पावे ॥ ३४ ॥

पूर्वजन्मांतीं जो । नसे विषयासक्त ॥
पुन्हा आचरत । योग पार्था ॥ ३५ ॥
ज्ञानी तपी आणि । कर्मांची ज्या प्रीति ॥
त्यांच्याही वरती । योगी प्रीय ॥ ३६ ॥
मत्परच चित्त । श्रध्दा मद्भजनीं ॥
तोची सर्वांहुनी । प्रीय मला ॥ ३७ ॥
ऐसें हें सहाव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ३८ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ३९ ॥

---

## अध्याय ७ वा.

कृ०-ज्ञान तुज सांगूं । विज्ञाना सहीत ॥
जेणें न उरत । अज्ञातसें ॥ १ ॥
लक्ष जनामध्यें । एकादा प्रयत्न ॥
करी, आत्मज्ञान ॥ मिळवावया ॥ २ ॥

ऐशा लक्षांमाजी । विरळा मजजाणें ॥
तयाचेंच जिणें । सार्थ झालें ॥ ३ ॥
पृथीवी सलील । पावक समीर ॥
पांचवें अंबर । पंचभूतें ॥ ४ ॥
मन आणि बुद्धि । तैसा अहंकार ॥
आठ हे प्रकार । मत्प्रकृतीचें ॥ ५ ॥
नामें ही अपरा । प्रकृति दुजी परा ॥
येणें परंपरा । दृशादृश्य ॥ ६ ॥
तंतूच्या आधारें । मणी राहताती ॥
माझ्यांत राहती । तेंवी लोक ॥ ७ ॥
उदकांत रस मी । सूर्यचंद्र प्रभा ॥
वेदांचा जो गाभा । प्रणव तो मी ॥ ८ ॥
शाश्वत तें बीज । भूतजाताचें मी ॥
बुद्धीवंताची मी । आहें बुद्धी ॥ ९ ॥
शास्त्रविहित काम । तोही मीच आहें ॥
तैसें बल पाहें । बलवंताचें ॥ १० ॥

सत्व-रज-तम । येणें मोहे जग ॥
त्यांसी माझा माग । कैंचा लागे ॥ ११ ॥
जे मज अनन्य । भावानें भजती ॥
माया ते तरती । त्रिगुणात्मिका ॥ १२ ॥
मूर्ख दुराचारी । अधम जे जन ॥
ते माझें भजन । न करीती ॥ १३ ॥
जिज्ञासू अर्थार्थी । आर्त आणि ज्ञानी ॥
हे माझ्या भजनीं । चौघे जण ॥ १४ ॥
या चौघांत ज्ञानी । मज आवडता ॥
न मज परता । ज्ञानीयासी ॥ १५ ॥
चौघेही असती । भक्तीसाठीं थोर ॥
ज्ञानीयाची सर । इतरां नये ॥ १६ ॥
कामनांनीं झाले । ज्ञानहत जन ॥
ते माझें भजन । विसरती ॥ १७ ॥
अन्य देवतांची । भक्ती करी त्याची ॥
श्रद्धा मी तेथेंची । स्थीर करीं ॥ १८ ॥

ज्याची जेथें श्रद्धा । तद्रूप होऊनी ॥
इष्ट मी देऊनी । तुष्ट करीं ॥ १९ ॥
मंदबुद्धी जन । मज न नेणती ॥
त्रिकाळींची गती । जाणत्याही ॥ २० ॥
इच्छा द्वेषें ज्याचें । मन भ्रांत झालें ॥
त्या जनां कोठलें । ज्ञान माझें ॥ २१ ॥
भूत वर्तमान । भावी वस्तुजात ॥
कोणी न जाणत । जाणतों मी २२ ॥
पुण्यभारें ज्यांचें । पाप वितूळलें ॥
त्यांनीं आळवीलें । मजलागीं ॥ २३ ॥
ऐशा पुण्यें ज्ञान । उपजतां चित्तां ॥
मृत्युची ते चिंता । न वाहती ॥ २४ ॥
दृश्य हें नश्वर । जाणें जीव शीव ॥
ज्ञानाचा प्रभाव । ऐसा आहे ॥ २५ ॥
अध्यात्मादी सर्व । कर्मेंहि जाणतो ॥
प्राणांतींही होतो । तो मच्चित्त ॥ २६ ॥

ऐसें हें सातव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ २७ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २८ ॥

---

## अध्याय ८ वा.

अ०-ब्रह्म आहे काय । काय तें अध्यात्म ॥
कैसें होय कर्म । आधीभूत ॥ १ ॥
आधिदैव काय । काय आधियज्ञ ॥
कैसी होई जाण । अंतीं तुझी ॥ २ ॥

कृ०-नाश ज्यास न जें । कारण सृष्टीला
ह्मणती तयाला । ब्रह्म पार्था ॥ ३ ॥
अध्यात्म तो जीव । कर्म सृष्टी बीज ॥
जाणूनी मनूज । भवनाशी ॥ ४ ॥

तेंच आधिभूत । दृश्य जें नश्वर ॥
जगाचा आधार । आधिदैव ॥ ५ ॥
या देहांत होय । ज्या योगें प्रेरणा ॥
आधियज्ञ जाणा । ह्मणवी तो ॥ ६ ॥
अंतकाळवरी । ध्यास माझा ज्याला ॥
अंतीं होत त्याला । स्मृति माझी ॥ ७ ॥
माझी स्मृति होई । देहावसानांत ॥
तो न संसारांत । पडे पुन्हां ॥ ८ ॥
माशीच्या धाकानें । किडा होत माशी ॥
राहोनीयां कोशीं । ध्यासानेंच ॥ ९ ॥
तैसा भगवंतीं । ध्यास नित्य ज्यासी ॥
तो त्याच रूपासी । पावतसे ॥ १० ॥
त्द्दय कमळीं । मन स्थीर करी ॥
ओंकाराचा करी । तेथें जप ॥ ११ ॥
आठवण माझी । धरूनी सोडीत ॥
प्राण तो पावत । गती माझी ॥ ११ ॥

साधनें कठीण । अनेक असती ॥
सर्वां न साधती । योगादिक ॥ १३ ॥
मी असें ज्यां प्रीय । नित्य माझी स्मृति ॥
ते भक्त पावती । मुक्तिसुखें ॥ १४ ॥
ब्रह्मादिकांसही । जन्म घेणें पडे ॥
मद्भक्तां न नडे । जन्म मृत्यु ॥ १५ ॥
सहस्र युगांचा । विधीचा दिवस ॥
प्राणीयांचा वास । त्यांत घडे ॥ १६ ॥
तितूकीच रात्र । सर्व लय पावे ॥
फिरून उगवे । विधिचा दीस ॥ १७ ॥
सरी ठुशी नाम । परी सर्व सोने ॥
मोडितांही सोने । जैसें तैसें ॥ १८ ॥
दागिन्यांत तैसें । सोन्यांतही आहे ॥
सोने पण नोहे । नष्ट पहा ॥ १९ ॥
तैसेंच सृष्टींत । ब्रह्मपण असे ॥
ती नासे, न नासे । ब्रह्मनित्य ॥ २० ॥

परम धाम तें । पावतां पूढती ॥
तया पुनरावृत्ति । नव्हे नव्हे ॥ २१ ॥
सर्वाधार सर्व । व्यापक अनंत ॥
भक्तीवीणे होत । कैसा प्राप्त ॥ २२ ॥
भक्तीनें विरक्ति । भक्तीनें सद्गती ॥
भक्तीनें श्रीपती । पावतसे ॥ २३ ॥
शुक्ल कृष्णगती । जगाच्या अनादी ॥
प्रथमें सद्गती । अन्यें जन्म ॥ २४ ॥
योगी जाणतो हें । परी तो न मोहे ॥
योगयुक्त राहे । तैसा तूंही ॥ २५ ॥
यज्ञ तप दानें । जें फळ मिळत ॥
योगी तें सोडीत । मोक्षासाठीं ॥ २६ ॥
ऐसें हें आठव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ २७ ॥
कृपाघन पार्थ–सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २८ ॥

## अध्याय ९ वा.

शुद्ध बुद्धि पार्था । श्रेष्ठ राज गुह्य ॥
मोक्षलाभा साह्य । सांगूं तूज ॥ १ ॥
कष्टावांचूनीया । सोपें आचराया ॥
भवाब्धि तराया । नौकाच ही ॥ २ ॥
स्थावर जंगम । भास आभास ही ॥
मद्रूपची पाही । तो तरतो ॥ ३ ॥
पार्था धर्मावरी । श्रद्धा जो न ठेवी ॥
कर्म त्या राबवी । संसारांत ॥ ४ ॥
स्थीरचर यांसी । मद्रूप जाणती ॥
भूतें कां भासती । सांग बरें ॥ ५ ॥
माझ्या कल्पनेनें । भूतें भासताती ॥
येर तीं असती । मद्रूपची ॥ ६ ॥
सर्वांठायीं करी । माझीच भावना ॥
तेणें संभावना । या जीवाची ॥ ७ ॥

परम धाम तें । पावतां पूढती ॥
तया पुनरावृत्ति । नव्हे नव्हे ॥ २१ ॥
सर्वाधार सर्व । व्यापक अनंत ॥
भक्तीवीणे होत । कैसा प्राप्त ॥ २२ ॥
भक्तीनें विरक्ति । भक्तीनें सद्गती ॥
भक्तीनें श्रीपती । पावतसे ॥ २३ ॥
शुक्ल कृष्णगती । जगाच्या अनादी ॥
प्रथमें सद्गती । अन्यें जन्म ॥ २४ ॥
योगी जाणतो हें । परी तो न मोहे ॥
योगयुक्त राहे । तैसा तूंही ॥ २५ ॥
यज्ञ तप दानें । जें फळ मिळत ॥
योगी तें सोडीत । मोक्षासाठीं ॥ २६ ॥
ऐसें हें आठव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ २७ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २८ ॥

## अध्याय ९ वा.

शुद्ध बुद्धि पार्था । श्रेष्ठ राज गुह्य ॥
मोक्षलाभा साह्य । सांगू तूज ॥ १ ॥
कष्टावांचूनीया । सोपें आचराया ॥
भवाब्धि तराया । नौकाच ही ॥ २ ॥
स्थावर जंगम । भास आभास ही ॥
मद्रूपची पाही । तो तरतो ॥ ३ ॥
पार्था धर्मावरी । श्रद्धा जो न ठेवी ॥
कर्म त्या राववी । संसारांत ॥ ४ ॥
स्थीरचर यांसी । मद्रूप जाणती ॥
भूतें कां भासती । सांग बरें ॥ ५ ॥
माझ्या कल्पनेनें । भूतें भासताती ॥
येर तीं असती । मद्रूपची ॥ ६ ॥
सर्वाठायीं करी । माझीच भावना ॥
तेणें संभावना । या जीवाची ॥ ७ ॥

आकाशांत वायू । स्थीर तों न कळे ।
उपाधीनें कळे । चांचल्याच्या ॥ ८ ॥
तैसें भूतमात्र । याच दृष्टांतानें ॥
पाहे अनुमानें । माझ्यामध्यें ॥ ९ ॥
कल्पांत सरतां । करीतों उत्पत्ती ॥
सर्व भूतती । कर्मबद्ध ॥ १० ॥
हें सर्व करी मी । परी न आसक्ती ॥
उदासीन वृत्ती । सर्वां ठायीं ॥ ११ ॥
चराचराचा मी । स्वामी हें नेणती ॥
मनुष्य ह्मणती । अज्ञ मला ॥ १२ ॥
ज्याचा आशा भंग । झाला ते पोंचत ॥
राक्षसी वृत्तींत । दीर्घकाळ ॥ १३ ॥
तेंवी ज्यांचें कर्म । झालें विफलीत ॥
आसूरी वृत्तींत । लोळती ते ॥ १४ ॥
कळतां नाकळे । मन ते धीमंत ॥
मोहीनी वृत्तींत । लोळताती ॥ १५ ॥

देवी वृत्ती ज्याची । चित्तशुद्ध मती ॥
ते मज जाणती । भक्त माझे ॥ १६ ॥
अखंड कीर्तन । भक्तीनें नमन ॥
करीतां उन्मन । भक्त पावे ॥ १७ ॥
कोणी अनन्यत्वें । कोणी अभिन्नत्वें ॥
कोणी भेदभावें । ध्याती मला ॥ १८ ॥
नाना रूपें माझीं । मानूनी भजती ॥
विश्वरूपें ध्याती । कोणी मज ॥ १९ ॥
धान्यौषधी मंत्र । घृतादि आहूती ॥
माझींच असती । रूपें पार्था ॥ २० ॥
ओंकार ऋग्वेद । यजुःसामाथर्व ॥
हे ही आहे सर्व । मद्रूपची ॥ २१ ॥
सर्वाधार सर्व । साक्षीभूत धाम ॥
काळही निस्सीम । तोही मीच ॥ २२ ॥
तप्तता पर्जन्य । मोक्ष मृत्यु तो मी ॥
नित्यानित्यही मी । समज पार्था ॥ २३ ॥

अनन्य भक्तांची । चिंता मी वाहतों ॥
देऊनी रक्षीतों । आंगें मीच ॥ २४ ॥
सर्व यज्ञ भोक्ता । देवदेवा मातें ॥
नेणता परते । संसारांत ॥ २५ ॥
ज्यासी ज्याची भक्ति। त्यासी त्याची गती ॥
मजला मिळती । माझे भक्त ॥ २६ ॥
पान फूल फळ । जळही भक्तीनें ॥
अर्पीतां प्रीतीनें । सेवीतों मी ॥ २७ ॥
करीसी होमीसी । खासी दान देशी ॥
तपीसी तें मसीं । अर्पीत जा ॥ २८ ॥
मदर्पणें तुझा । कर्मबंध सूटे ॥
भवबंध तूटे । मुक्त होशी ॥ २९ ॥
सर्वांभूतीं असें । मी सदा समान ॥
प्रीय द्वेष्यही न । कोणी मला ॥ ३० ॥
माझ्या भक्तीसाठीं । नित्य जे कष्टत ॥
त्यांपाशीं तिष्ठत । सर्वदां मी ॥ ३१ ॥

नित्य अनन्यत्वें । माझी भक्ति करी ॥
जरी दुराचारी । होई साधु ॥ ३२ ॥
दुराचारी भक्त । भक्तीनें निवळे ॥
निवळतां वळे । मोक्षमार्गा ॥ ३३ ॥
नीचकुलजही । स्त्रिया वैश्य शूद्र ॥
हे भक्तीनें भद्र । पावताती ॥ ३४ ॥
अनित्य दुःखद । आलासे पदरीं ॥
नरदेह करी । भक्ति माझी ॥ ३५ ॥
भक्तीनें या देहीं । मोक्षही मीळतो ॥
कामीजन जातो । नरक पुरा ॥ ३६ ॥
दृढ भक्ति माझी । अंतरीं ठेवीसी ॥
निश्चयें पावसी । येणें मला ॥ ३७ ॥
माझी आठवण । मच्चरणीं मन ॥
मत्पर होऊन । वागे पार्था ॥ ३८ ॥
ऐसें हें नवव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनिया धीर । पुढें ऐका ॥ ३९ ॥

कृपाघनपार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ४० ॥

---

## अध्याय १० वा.

पार्था तुझी प्रीती । मला बहूसाल ॥
हिताचे तूं बोल । ऐके पुन्हा ॥ १ ॥
देव ऋषीगण । जाणती न मला ॥
माझा जन्म झाला । त्यांच्या आधी ॥ २ ॥
माझ्यांतून माया । उत्पन्न जाहली ॥
तीनेंच ही केली । सर्व सृष्टी ॥ ३ ॥
अजन्मा अनादी । ऐसें जाणें मला ॥
तो सुधी रमला । आत्मानंदीं ॥ ४ ॥
हा माझा विभूती-योग जो जाणतो ॥
तयासी बाणतो । ज्ञानयोग ॥ ५ ॥
माझ्या पासूनीच । सर्वांची उत्पत्ति ॥
ह्मणोनीयां ध्याती । ज्ञानी मला ॥ ६ ॥

भिन्न भिन्न भाव । प्राणीयासी होती ॥
तयांची उत्पत्ती । माझ्यामुळें ॥ ७ ॥
बुद्धि ज्ञान क्षमा । उद्वेग आराम ॥
तप दान शम । भयाभय ॥ ८ ॥
अहिंसा समता । इत्यादिक वृत्ती ॥
सर्वांची उत्पत्ती । माझ्यामुळें ॥ ९ ॥
ब्रह्मा सप्तऋषी । मन्वादिक सुधी ॥
निर्मियेले आधीं । मनानें मी ॥ १० ॥
तयां पासूनी ही । विश्वोत्पत्ती झाली ॥
अखंड राहीली । माझ्यायोगें ॥ ११ ॥
ऐसे थोर थोर । माझ्याच विभूती ॥
जाणोनी भजती । ज्ञानी मला ॥ १२ ॥
माझ्या ठायीं चित्त । माझ्या ठायीं प्राण ॥
ठेवोनी भजन । करीताती ॥ १३ ॥
ऐशा प्रेमळासी । ज्ञानयोग देतों ॥
अज्ञान नासीतों । त्याचें मीच ॥ १४ ॥

प्रेमाचे हे बोल । ऐकोनीयां धाला ॥
कराया लागला । स्तुति पार्थ ॥ १५ ॥
अ०–अज सर्वेश्वर । शाश्वत ब्रह्म तूं ॥
देवा वैकुंठ तूं । परंधाम ॥ १६ ॥
सर्वव्यापी सर्वा–धार अससी तूं ॥
स्वयं प्रकाश तूं । परब्रह्म ॥ १७ ॥
सर्व भूतांसी तूं । होसी उत्पादक ॥
सृष्टीचा चालक । तूं केशवा ॥ १८ ॥
नारदादिकांनीं । जें जें कथीयेलें ॥
तेंच सांगितलें । देवा तूंही ॥ १९ ॥
सर्व जगीं तुझ्या । भरल्या विभूती ॥
जाणसी श्रीपती । तुझ्या तूंच ॥ २० ॥
कोण्यारूपें तुझें । चिंतन करावें ॥
कैसेनी जाणावें । देवा तुला ॥ २१ ॥
सांगीतल्या तुझ्या । देवा त्वां विभूती ॥
परी माझी तृप्ती । नाहीं झाली ॥ २२ ॥

ह्मणोनी सांगाव्या । दिव्य त्या विभूती ॥
आह्मां तूंच गती । सर्वेश्वरा ॥ २३ ॥
कृ०—माझ्या विभूतींचा । अंत पार नसे ॥
परी सांगतसे । दिव्य कांहीं ॥ २४ ॥
आदि मध्य अंत । भूतांचा मी असें ॥
तयांत विलसें । आत्मा मीच ॥ २५ ॥
सर्व देवांमध्यें । विष्णू विभूती मी ॥
प्रकाशकांत मी । मुख्य भानु ॥ २६ ॥
मरुद्गणांमध्यें । मुख्य मरीची मी ॥
तारागणांत मी । चंद्रमा जो ॥ २७ ॥
वेदांत साम मी । देवांत इंद्र मी ॥
मुख्य मन तें मी । इंद्रियांत ॥ २८ ॥
सर्वदेहांमध्यें । चलन वलन ॥
जीवकळा जाण । मीच आहें ॥ २९ ॥
यक्ष राक्षसांत । कुबेर असें मी ॥
पार्वतीवर मी । रुद्रांमध्यें ॥ ३० ॥

वसूमध्यें अग्नी । पर्वतांत मेरू ॥
मी तो सुर गुरु । बृहस्पति ॥ ३१ ॥
सेनापतींमध्यें । मुख्य जो सेनानी ॥
विभूती ती मानी । स्कंद माझी ॥ ३२ ॥
जलाशयां मध्यें । मुख्य जो सागर ॥
तैसा ऋषीवर । भृगू तो मी ॥ ३३ ॥
मेरूमणी असें । वाणीचा ओंकार ॥
मद्रूप आधार । जगताचा ॥ ३४ ॥
माझीच विभूती । जप यज्ञ बापा ॥
जयाच्या प्रतापा । सीमा नाहीं ॥ ३५ ॥
पर्वतांत मुख्य । हिमालय तो मी ॥
अश्वत्थ तोची मी । वृक्षांमध्यें ॥ ३६ ॥
गंधर्वांत मुख्य । चित्ररथ तो मी ॥
कपिल महामुनी । सिद्धांतला ॥ ३७ ॥
हत्तीच्या कुळांत । ऐरावत तो मी ॥
मनुष्यांमध्यें मी । राजा आहें ॥ ३८ ॥

धेनूंत विभूती । कामधेनू ती मी ॥
आर्यमा असें मी । पितरांतला ॥ ३९ ॥
दैत्यांत प्रह्लाद । पशूंत सिंह मी ॥
गरुड असें मी । पक्षांमध्यें ॥ ४० ॥
वेगवानांमध्यें । पवन असें मी ॥
नद्यांत असें मी । गंगाबाई ॥ ४१ ॥
आदी मध्य अंत । सृष्टीचा असें मी ॥
ब्रह्मविद्या ती मी । आहें पार्था ॥ ४२ ॥
ग्राहक शक्ती मी । तैल बुद्धी ही मी ॥
वक्तृत्व कीर्ति मी । सर्व शोभा ॥ ४३ ॥
तेजस्वीयांमध्यें । तेज तें असें मी ॥
मासांत असें मी । मार्गशीर्ष ॥ ४४ ॥
यादवांत मुख्य । वासुदेव तो मी ॥
तैसाच पार्थ मी । पांडवांत ॥ ४५ ॥
दंडकर्त्यांमध्यें । यम तो असें मी ॥
ज्ञानीयांमध्यें मी । ज्ञानरूप ॥ ४६ ॥

स्थावर जंगम । सर्व वस्तुजात ॥
बीजरूपें तात । तयांचा मी ॥ ४७ ॥
जें जें तूज श्रेष्ठ । वाटेल सृष्टींत ॥
तें जाण निभ्रांत । माझें रूप ॥ ४८ ॥
माझ्या विभूतींचा । नसे अंत पार ॥
सांगूं कोठवर । कुंतीपुत्रा ॥ ४९ ॥
ही सर्व जगती । माझा एक अंश ॥
याहूनी विशेष । काय सांगूं ॥ ५० ॥
ऐसें हें दहाव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ ५१ ॥
कृपाघन पार्थ–सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ५२ ॥

---

## अध्याय ११ वा.

अ०–अध्यात्म ज्ञानाचा । उपदेश केला ॥
तेणें नष्ट झाला । मोह माझा ॥ १ ॥

सृष्टीचा उगम । नाश कथीयेला ॥
तो मज कळला । बोध तुझा ॥ २ ॥
ऐश्वर योगाचें । वर्णन ऐकीलें ॥
मन लोभावलें । तो पाहाया ॥ ३ ॥
आजवरी देवा । पुरवीली आस ॥
दावी या दासास । विश्वरूप ॥ ४ ॥
योग्य जरी असें । पाहण्यासी देवा ॥
विश्वरूप दावा । कृपासिंधो ॥ ५ ॥
कृ०-विनंती सरसे । ह्मणे पहा पहा ॥
इच्छिसी तें पहा । माझ्या देहीं ॥ ६ ॥
सर्व स्थीरचर । जें जें तूं कल्पीशी ॥
न ठेवी असोशी । सर्व पहा ॥ ७ ॥
दावा ह्मणतांची । लागले दावाया ॥
पार्थ न पाहाया । शक्त झाला ॥ ८ ॥
पाहिल्याचें चिन्ह । कांहींच दिसेना ॥
वर्म नारायणा । कळलें त्याचें ॥ ९ ॥

कृ०—या चर्मचक्षूंनीं । दिसे न हें तूला ॥
विसर पडला । तुझ्या बोलें ॥ १० ॥
ह्मणूनी तूजला । दिव्य दृष्टि देतों ॥
ऐश्वर योग तो । पाहा आतां ॥ ११ ॥
दिव्य अलंकार । दिव्य अस्त्रें हातीं ॥
नेत्र झळकती । असंख्यात ॥ १२ ॥
दिव्य पुष्पें वस्त्रें । देहावरी देखे ॥
असंख्यात मुखें । पार्थ पाही ॥ १३ ॥
सहस्त्र सूर्यांचें । तेजही फिकट ॥
ऐसी देहीं खेट । प्रकाशाची ॥ १४ ॥
कृष्ण देहा ठायीं । जग पाहीयेलें ॥
कांहीं न राहीलें । पाहण्याचें ॥ १५ ॥
आश्चर्यें रोमांच । आंगीं थरारले ॥
हस्त जोडीयेले । नम्रपणें ॥ १६ ॥
ब्रह्मा विष्णु आणि । महेश दीसत ॥
सर्व ऋषी आंत । पाहातसे ॥ १७ ॥

चवदा भूवनें । पाहीलीं विश्वेशा ॥
सहस्रही दिशा । कोंदाटल्या ॥ १८ ॥
विश्वरूप तुझें । अनंत देखत ॥
आदि मध्य अंत । न कळे तूझा ॥ १९ ॥
शंखचक्रगदा । दिव्य पद्म हातीं ॥
पसरली कांती । सर्वा ठायीं ॥ २० ॥
विद्युत्कांतीसस । प्रभा ही फांकली ॥
तेणें दीपावली । दृष्टीमाझी ॥ २१ ॥
नाश रहीत तूं । स्वयं प्रकाशक ॥
धर्म संरक्षक । देवा तूंच ॥ २२ ॥
आदि मध्य अंत । तूज न अनंता ॥
चंद्रमा सवीता । नेत्र तूझे ॥ २३ ॥
मुखामध्यें अग्नी । धडकला असे ॥
तेंणें तापतसे । सर्व सृष्टी ॥ २४ ॥
चवदा भूवनें । दिशा अंतराळा ॥
व्यापूनी गोपाळा । उरलासी ॥ २५ ॥

तुझें उग्ररूप । पाहूनी अद्भूत ॥
त्रैलोक्य व्यथीत । होत आहे ॥ २६ ॥
कोणी देव तुझ्या । मध्यें रीघताती ॥
स्तुती करीताती । किती एक ॥ २७ ॥
ऋषी सिद्ध तुझी । स्तुती करीताती ॥
कल्याण भाकीती । जगताचें ॥ २८ ॥
रुद्रादित्य वसू । साध्य विश्वेदेव ॥
पितर गंधर्व । यक्ष सिद्ध ॥ २९ ॥
हे सर्वही तूज । आश्चर्यें पाहती ॥
इतरांची स्थिति । काय वर्णूं ॥ ३० ॥
अनंत हीं मुखें । किती हातपाय ॥
खुंटला उपाय । बोलण्याचा ॥ ३१ ॥
तूझें भव्य रूप । विक्राळ या दाढा ॥
देखोनीयां गाढा । भयें कांपें ॥ ३२ ॥
दृष्टीही दीपली । सखया अनंता ॥
देहीं न शांतता । वसे माझ्या ॥ ३३ ॥

धैर्य धरवेना । जीव भांबावला ॥
हे दीनवत्सला । प्रसन्न हो ॥ ३४ ॥
तुझीया भ्यासूर । वदनीं शीरती ॥
सर्व भूपतती । तांतडीनें ॥ ३५ ॥
धृतराष्ट्रपुत्र । तैसे भीष्म द्रोण ॥
सूतपुत्र कर्ण । तोही रीघे ॥ ३६ ॥
विक्राळ दाढांत । शिरें अडकलीं ॥
चिरडोनी गेलीं । कीतीकांची ॥ ३७ ॥
सरीतांचे ओघ । सागरीं शीरती ॥
तेंवी वीर जाती । तुझ्या मुखीं ॥ ३८ ॥
अग्नींत पतंग । पडोनी मरती ॥
वीरां तीच रीती । वदनीं तूझ्या ॥ ३९ ॥
काय उग्र रूप । कोण ह्मणूं तूशीं ॥
वंदी चरणासी । दास तूझा ॥ ४० ॥
देवा तूज आद्या । जाणूं मी इच्छीतों ॥
प्रवृत्ती नेणतों । कैसी तूझी ॥ ४१ ॥

कृ०-सर्वांचा अंतक । काळ प्रवर्तलों ॥
भक्षाया बैसलों । सर्व सैन्य ॥ ४२ ॥
शत्रू जिंकायासी । चाप सज्ज करी ॥
निमित्ताला तरी । होई पुढें ॥ ४३ ॥
पूर्वीच मारूनी । ठेवीलें मी यांसी ॥
मारूनी तूं त्यांसी । राज्य भोगी ॥ ४४ ॥
जिंकीशील शत्रू । होऊं नको खिन्न ॥
मरण प्रसन्न । असे त्यांसी ॥ ४५ ॥
ऐकोनी हे बोल । पार्थ जोडी हात ॥
थरारा कांपत । भांबावला ॥ ४६ ॥
भीतीनें घेरला । अडखळे वाणी ॥
जोडीयेले पाणी । पार्थे पुन्हा ॥ ४७ ॥
जन तूज गाती । सिद्ध वंदिताती ॥
राक्षस पळती । दाहीदिशा ॥ ४८ ॥
दृश्य वेद्य आणि । दृश्यादृश्यातीत ॥
तूजसी वंदीत । सिद्धजन ॥ ४९ ॥

पुराण पुरूषा । हे अनंत रूपा ॥
आदि मध्य बापा । जगाचा तूं ॥ ५० ॥
विश्वाचा अंत तूं । विश्व व्यापक तूं ॥
परंधाम ही तूं । आदिदेवा ॥ ५१ ॥
वायू यम अग्नी । वरूण चंद्रमा ॥
चतुर्मुख ब्रह्मा । सर्वेशा तूं ॥ ५२ ॥
अनंता अनंत । नमस्कार करूं ॥
पुन्हा हें लेंकरूं । पदीं लीन ॥ ५३ ॥
सबाह्य अंतरें । करीं नमनासी ॥
सर्व व्यापकासी । सर्वां ठायीं ॥ ५४ ॥
देवा अज्ञपणें । जरी प्रेमें तुला ॥
सौंगडी मानीला । क्षमा करी ॥ ५५ ॥
महीमा नेणतां मी । केलें अपमाना ॥
करीतों प्रार्थना । क्षमाशीला ॥ ५६ ॥
पुत्रापराधासी । पिता क्षमा करी ॥
तेंवी क्षमाकरी । या दासाला ॥ ५७ ॥

पत्नीचे अन्याय । पती क्षमा करी ॥
मित्रा न आव्हेरी । मित्र कधीं ॥ ५८ ॥
पाहूनी हें रूप । हर्ष वरी वरी ॥
परी मी अंतरीं । भ्यालों आहे ॥ ५९ ॥
देवा नित्याचें तें । रूप दाखवा हो ॥
मन घेत लाहो । त्या रूपाचा ॥ ६० ॥
देवा शंख चक्र । गदा पद्म हातीं ॥
मूर्ती ती श्रीपती । दावा कीं हो ॥ ६१ ॥
कृ०—योग बळें रूप । दाविलें हें तूला ॥
नाहीं इतराला । दाखवीलें ॥ ६२ ॥
वेदाध्ययनानें । दानें अनुष्ठानें ॥
उग्रही तपानें । साध्य न हें ॥ ६३ ॥
आत्मदृष्टीनें तूं । हेंच रूप पहा ॥
स्वस्थ चित्तें रहा । भीऊं नको ॥ ६४ ॥
ऐसें बोलोनीयां । पूर्व रूप धरी ॥
दुःखातें निवारी । अर्जूनाच्या ॥ ६५ ॥

अ०—मनुष्य रूप हें । तूझें जनार्दना ॥
पाहोनीयां मना । स्वास्थ्य आलें ॥ ६६ ॥
कृ०—विराट रूप जें । तुजला दावीलें ॥
कोणी न देखीलें । आजवरी ॥ ६७ ॥
पुन्हाही सांगतों । यज्ञें तपें दानें ॥
कोणत्याही यत्नें । नव्हे साध्य ॥ ६८ ॥
अनन्य भक्ती जो । करी त्या नराला ॥
दृश्य इतरांला । नव्हें कधीं ॥ ६९ ॥
मत्परच कर्में । मीच ज्यासी गती ॥
ते भक्त मिळती । मद्रूपासी ॥ ७० ॥
सर्व भूतां ठाई । निरिच्छ निर्वैर ॥
त्या भक्तासी थार । माझ्या रूपीं ॥ ७१ ॥
ऐसें अकराव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ ७२ ॥
कृपाघन पार्थ—सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ७३ ॥

---

# अध्याय १२ वा.

अ०—योगयुक्त भक्त । अव्यक्तोपासक ॥
या दोंत अधिक । देवा कोण ॥ १ ॥
कृ०—अत्यंत श्रद्धावान् । मद्रूपींच मन ॥
लावूनीयां ध्यान । भक्त करी ॥ २ ॥
तयाहूनी गौण । अव्यक्तोपासक ॥
हें माझें निःशंक । मत आहे ॥ ३ ॥
दाखवीतां नये । कल्पनाही नोहे ॥
सर्वव्यापक हें । ब्रह्म आहे ॥ ४ ॥
त्याच्यासाठीं तप । इंद्रियें रोधून ॥
करीतां येऊन । मिळती मला ॥ ५ ॥
रूपोपासकासी । कष्टाचा न लेश ॥
अव्यक्तासी क्लेश । बहूतची ॥ ६ ॥
कर्मार्पणें भक्त । मत्पर चित्तानें ॥
अनन्य भक्तीनें । ध्यातो मला ॥ ७ ॥

ऐशा मद्भक्ता मी । संसाराब्धींतूनी ॥
त्वरें उद्धरूनी । नेतों पार्था ॥ ८ ॥
माझ्या ठायीं मन । मत्परच बुद्धी ॥
ठेवीतां सुखाब्धी । अंतीं मीळे ॥ ९ ॥
माझ्या प्राप्तीसाठीं । ऐसें न करवें ॥
अभ्यासें साधावें । तरी स्थैर्य ॥ १० ॥
अभ्यास योगही । करवेना तूला ॥
सर्व कर्में मला । अर्पीत जा ॥ ११ ॥
कर्मार्पण योग । तुजसी साधेना ॥
विषय वासना । दूर सारीं ॥ १२ ॥
योगाभ्यासाहूनी । श्रेष्ठ असे ज्ञान ॥
तयाहूनी ध्यान । थोर आहे ॥ १३ ॥
ध्यानाहूनी थोर । कर्मफल त्याग ॥
तेणें शांती संग । अखंडीत ॥ १४ ॥
सुख दुःखीं सदा । सम क्षमाशील ॥
तो प्रीय प्रेमळ । भक्त माझा ॥ १५ ॥

संतुष्ट स्थीरधी । मत्परची झाला ॥
तो भक्त मजला । आवडता ॥ १६ ॥
ज्याची भीती कोणा। कोणाची न ज्याला॥
तो प्रीय मजला । त्या प्रीय मी ॥ १७ ॥
मनीं न विषाद । हर्षामर्ष भय ॥
तो मजला प्रीय । प्राणापरी ॥ १८ ॥
इच्छा खेद गेला । उदासीन वृत्ती ॥
त्या भक्ताची प्रीती । मला फार ॥ १९ ॥
मान अवमान । शत्रू मित्र सम ॥
सुख दुःख सम । निंदा स्तुती ॥ २० ॥
प्रारब्धानें मिळे । त्यांतची जो तुष्ट ॥
ऐसा भक्त श्रेष्ठ । प्रीय मला ॥ २१ ॥
श्रद्धावान् मद्भक्त । मज उपासीती ॥
त्यांची मला प्रीती । बहूसाल ॥ २२ ॥
ऐसें हें बाराव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ २३ ॥

कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २४ ॥

---

## अध्याय १३ वा.

पार्था शरीरा या । क्षेत्र ह्मणताती ॥
क्षेत्रज्ञ ह्मणती । तें जाणत्या ॥ १ ॥
सर्व क्षेत्रांमध्यें । क्षेत्रज्ञ असें मी ॥
या ज्ञाना ज्ञान मी । मानीतसें ॥ २ ॥
क्षेत्र त्याचे भेद । तयांचें कारण ॥
करूं निरूपण । क्षेत्रज्ञांचें ॥ ३ ॥
आकाश समीर । तेज जल मही ॥
या पांचाचें पाही । विषय पांच ॥ ४ ॥
शब्द स्पर्श रूप । रस गंध जाणा ॥
करीतां गणना । झालीं दहा ॥ ५ ॥
दशेंद्रीयें बुद्धी । अहंकार मन ॥
माया तत्व जाण । चोवीसावें ॥ ६ ॥

या चोवीस तत्वीं । देह हा बनला ॥
चैतन्यें लागला । नाचावया ॥ ७ ॥
इच्छादि धारणा । वृत्तीचें चेतन ॥
यांचें आयतन । आहे देह ॥ ८ ॥
मान दंभ नसे । सदां क्षमाशील ॥
अत्यंत प्रेमळ । सर्वां ठायीं ॥ ९ ॥
गुरुभक्ती स्थैर्य । शुद्ध अंतर्बाह्य ॥
हें ज्ञानाचें कार्य । ह्मणवीतें ॥ १० ॥
विषयवैराग्य । जन्म मृत्यु जरा ॥
आठवही नरा । ज्ञानामुळें ॥ ११ ॥
पत्नी पुत्र गृह । यांची न आसक्ती ॥
उदासीन वृत्ती । ज्ञानामुळें ॥ १२ ॥
निर्जनीं एकांतीं । मज आळवावें ॥
फळ समजावें । ज्ञानाचें हें ॥ १३ ॥
या जडदेहांत । मी ह्मणजे कोण ॥
पाहाणें शोधून । ज्ञानामुळें ॥ १४ ॥

याच्या विरहीत । अज्ञान सगळें ॥
नलगे वेगळें । सांगावया ॥ १५ ॥
सदसताहूनी । भिन्न परब्रह्म ॥
जाणल्यानें क्षेम । अखंडीत ॥ १६ ॥
सर्वाठायीं डोळे । हातपाय मुख ॥
तें सर्व व्यापक । परब्रह्म ॥ १७ ॥
इंद्रियत्वें कळे । त्यांत न मीसळे ॥
भरलें आगळें । नाहीं कोठें ॥ १८ ॥
अत्यंत दूर तें । जवळही आहे ॥
चराचरा राहे । व्यापोनीया ॥ १९ ॥
भूतमात्रीं भिन्न । असोनी अभिन्न ॥
पाणीपरी भिन्न । गारांपरी ॥ २० ॥
सर्व भूताधार । भूतरूपें भासे ॥
ज्ञेय तेंच असे । परब्रह्म ॥ २१ ॥
चंद्र सूर्यादीक । तेजांतही वसे ॥
चेत्तांत विलसे । प्राणीयांच्या ॥ २२ ॥

क्षेत्र ज्ञानज्ञेय । सांगीतलें बापा ॥
जाणतां मद्रूपा । भक्त पावे ॥ २३ ॥
अनादी पुरुष । प्रकृती असती ॥
भाव गुणोत्पत्ती । मायेमुळें ॥ २४ ॥
कर्तृत्व कारण । कार्या हेतू माया ॥
हीला वावराया । ज्ञेय तेंच ॥ २५ ॥
माया संगें भोक्ता । पुरुष ह्मणवीतो ॥
तेणें जन्म घेतो । नाना देहीं ॥ २६ ॥
देहांत राहून । कर्म तसें फळ ॥
देतो अचंचळ । आत्माराम ॥ २७ ॥
पालक तोचि तो । भोक्ता महेश्वर ॥
आत्म्याहूनी पर । ह्मणताती ॥ २८ ॥
प्रकृती गुणयुक्त । आत्म्यातें जाणतो ॥
कैसाही वर्तो तो । बंधमुक्त ॥ २९ ॥
कोणी ध्यान योगें । कोणी सांख्य योगें ॥
कर्म भक्ती मार्गें । उद्धरती ॥ ३० ॥

क्षेत्र क्षेत्रज्ञांनीं । स्थावर जंगम ॥
उत्तम अधम । होत असे ॥ ३१ ॥
भूतमात्रीं ईश । भुताभावीं असे ॥
हें जो जाणतसे । तो डोळस ॥ ३२ ॥
सम दृष्टी पाहे । सर्वत्र इश्वर ॥
तो पावतो नर । मोक्ष पदा ॥ ३३ ॥
मायेच्याच मुळें । कर्में घडताती ॥
हें जाणें त्या ह्मणती । पाहणारा ॥ ३४ ॥
सूक्ष्मत्वें आकाश । सर्वत्र भरलें ॥
परी तें राहीलें । अलिप्तची ॥ ३५ ॥
तैसा सर्व देहीं । आत्मा विलसतो ॥
परी न मळतो । गुणदोषानें ॥ ३६ ॥
प्रकाशाच्या योगें । पापपुण्यें होती ॥
परी न लागती । सूर्यास तीं ॥ ३७ ॥
तैसाच हा आत्मा । लिप्त नव्हे कर्में ॥
वर्ततो निर्धर्में । सर्वां ठाईं ॥ ३८ ॥

ऐसें हें तेराव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ३९ ॥
कृपाघन पार्थ–सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ४० ॥

---

## अध्याय १४ वा.

ज्ञानांत उत्तम । ज्ञान पार्था तूला ॥
सांगतों मुक्तिला । देणारें जें ॥ १ ॥
जे या ज्ञानबळें । मद्रुप पाहाती ॥
जन्म मृत्यु भीती । त्यांसी नाहीं ॥ २ ॥
मायेच्या पोटीं मी । ब्रह्म बीज स्थापीं ॥
तेथूनी प्रतापी । तत्वें झालीं ॥ ३ ॥
सत्व रज तम । हे मायेचे गुण ॥
बंधासीं कारण । देहधाऱ्यां ॥ ४ ॥
सत्व गुण आहे । स्वतः प्रकाशक ॥
होतसे बाधक । सौख्य संगें ॥ ५ ॥

पार्थां प्रीतीरूप । असे रजो गुण ॥
इच्छेसी कारण । तोची आहे ॥ ६ ॥
जीवांकडून तो । कर्म करवीतो ॥
गोवून सोडीतो । संसारांत ॥ ७ ॥
अज्ञाना पासून । तमोगुण होतो ॥
मोहूनी सोडीतो । सर्व जीवां ॥ ८ ॥
कर्तव्य विघडी । आळस वाढवी ॥
मोहातें चढवी । तमोगुण ॥ ९ ॥
सुख भोगीं सत्व । कर्मं रज वाढे ॥
तैसें तम गाढें । दुर्लक्षीं तें ॥ १० ॥
सत्व रज तम । गुणांतला एक ॥
अन्यासी बाधक । वर्चस्वानें ॥ ११ ॥
सर्वेंद्रियांतून । ज्ञान प्रकाशतें ॥
वृद्धीतें पावतें । सत्व तेव्हां ॥ १२ ॥
रज वाढल्यानें । लोभ कर्मीं गति ॥
तेणेंच अशांती । वाढतसे ॥ १३ ॥

तम वाढल्यानें । मोह ऊपजतो ॥
प्रमाद् वर्ततो । याचगुणें ॥ १४ ॥
सत्व वृद्धी काळीं । जर मृत्यु आला ॥
विष्णू लोक त्याला । प्राप्त होतो ॥ १५ ॥
रजीं मृत्यु येतां । कर्मठ जन्मत ॥
तमीं तो पावत । मूढ योनी ॥ १६ ॥
सात्वीककर्मासी । फळ ये निर्मळ ॥
दुःख रूप फळ । रजकर्मा ॥ १७ ॥
तामस कर्मानें । ज्ञान दूर पळे ॥
मूढपणें चळे । बुद्धी त्याची ॥ १८ ॥
सत्वानें उत्तम । रजानें मध्यम ॥
तमानें अधम । गती पावे ॥ १९ ॥
आत्मा गुणातीत । गुण संघ कर्ता ॥
हें सत्य जाणतां । मोक्ष मीळे ॥ २० ॥
अ०-देवा कोण्या रीती । गुणां जाणोनीयां ॥
अतिक्रमोनीयां । असे भक्त ॥ २१ ॥

२२२

कृ०-सत्वगुणें ज्ञान । रजानें प्रवृत्ती ॥
मोहतसे वृत्ती । तमोगुणें ॥ २२ ॥
स्वभावें असती । गुणांचीं हीं कार्यें ॥
मानूनी तूं धैर्यें । भिन्न राहे ॥ २३ ॥
सुख दुःखीं ज्याचें । समान मानस ॥
ह्मणती तयास । गुणातीत ॥ २४ ॥
अनन्य मद्भक्त । त्रिगुणां उलुंघीत ॥
भक्तीनें पावत । सौख्य सिंधू ॥ २५ ॥
ऐसें चवदाव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ३६ ॥
कृपाघन पार्थ । सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २७ ॥

---

## अध्याय १५ वा.

संसारासी कोणी । अश्वत्थ बोलती ॥
फांद्या त्या खालती । मूळवरी ॥ १ ॥

वेद ज्याचीं पानें । असे वृद्धीक्षय ॥
जाणे परि अव्यय । वेदज्ञ तो ॥ २ ॥
त्रिगुणांनीं वाढल्या । त्यास बहु शाखा ।
त्यांसी प्रतिशाखा । विषय रूप ॥ ३ ॥
कर्म रूप पाळें । असंख्य फूटती ॥
तेणें बद्ध होती । सर्व जीव ॥ ४ ॥
ऐसा जो हा वृक्ष । सर्वत्र वाढला ॥
पाहिजे तोडीला । ज्ञानशस्त्रें ॥ ५ ॥
मग अनाद्यंत । पद धुंडाळावें ॥
जेणें क्षय पावे । भवबंध ॥ ६ ॥
मोह अभिमान । जेणें झुगारीला ॥
अव्यय पदाला । तो पावतो ॥ ७ ॥
सूर्य प्रकाशाचें । नाहीं जेथें काम ॥
तेंच माझें धाम । शाश्वतचें ॥ ८ ॥
माझा अंश जीव । जाई देहांतरीं ॥
नेतो बरोबरी । सूक्ष्म देह ॥ ९ ॥

ज्ञानेंद्रियें मन । यां ठाई राहून ॥
तो करी सेवन । विषयांचें ॥ १० ॥
अ०-जीव एक देह । सोडूनीयां जातो ॥
दुज्यांत राहतो । कैशा रीती ॥ ११ ॥
कोणे रीती जीव । भोग हा भोगीतो ॥
मूर्ख हें नेणतो । ज्ञानी जाणें ॥ १२ ॥
कृ०-चैतन्यांश जीवा । योगी देहीं पाहे ॥
अन्य न जाणें हें । मंद बुद्धी ॥ १३ ॥
चंद्र सुर्या ठाई । आहे जो प्रकाश ॥
मत्तेजाचा अंश । विस्तारला ॥ १४ ॥
सर्व पृथ्वीमध्यें । मीच प्रवेशून ॥
प्राण्यांचें धारण । करीतों मी ॥ १५ ॥
जठराग्नीरूपें । देहांत राहून ॥
करीतों पचन । अन्नाचें मी ॥ १६ ॥
सर्वांच्या हृदयीं । आहे माझें स्थान ॥
स्मृति आणि ज्ञान । त्यामुळेंच ॥ १७ ॥

नाशवंत देहा क्षर । ह्मणताती ॥
आत्म्याची विभूती । तो अक्षर ॥ १८ ॥
याहून निराळा । व्यापी त्रैलोक्यास ॥
ह्मणताती त्यास । परमात्मा ॥ १९ ॥
क्षराक्षराहूनी । असें मी उत्तम ॥
ह्मणूनी पुरुषोत्तम । ह्मणती मला ॥ २० ।
ऐशा पुरुषोत्तमा । ज्ञानीच जाणतो ॥
अखंड भजतो । सर्व भावें ॥ २१ ॥
गुह्याहूनी गुह्य । सांगीतलें बापा ॥
भारता निष्पापा । धनंजया ॥ २२ ॥
होतो बुद्धीवंत । ज्यानें हें जाणिलें ॥
कर्तव्य संपलें । येथें त्याचें ॥ २३ ॥
ऐसें पंधराव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ २४ ॥
कृपाघन पार्थ–सखानारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ २५ ॥

# अध्याय १६ वा.

दैवी संपत्तीशीं । संमुख जो जन ॥
ऐक त्याचे गुण । सांगतसें ॥ १ ॥
जन्म मरणाचें । भय न त्याजला ॥
चित्ताचे शुद्धीला । नित्य जपे ॥ २ ॥
ज्ञानासाठीं शास्त्र । विहित आचार ॥
करीत आदर । दानाचाही ॥ ३ ॥
इंद्रिय निग्रह । सत्कर्मीं हव्यास ॥
जप तप ध्यास । चित्तीं त्याच्या ॥ ४ ॥
सरळ वागणें । अहिंसा अंतरीं ॥
तयाची वैखरी । सत्य वदे ॥ ५ ॥
रागाचा ज्या राग । वासनेचा त्याग ॥
शांतीचा न भंग । त्याच्या होई ॥ ६ ॥
निंदा न करणें । प्राण्यांवरी दया ॥
आसक्ती न जया । कोणा कार्यीं ॥ ७ ॥

बोलणें करणें । कोमल सहज ॥
दुष्कर्मांची लाज । चित्तीं त्याच्या ॥ ८ ॥
स्थीर बुद्धि तेज । तेथेंच विलसे ॥
क्षमाशील असे । वृत्ती सदां ॥ ९ ॥
स्वात्महितासाठीं । धैर्य बळकट ॥
संकटें लगट । जरी केली ॥ १० ॥
मन देह यांची । शुद्धता राखीतो ॥
घात न इच्छीतो । कोणाचाही ॥ ११ ॥
क्रिया गुण मान । यांचा नसे गर्व ॥
ऐसे त्याचे सर्व । शुद्ध गुण ॥ १२ ॥
वरी वरी बरी । करीतो करणी ॥
अंतरीं सरणी । अश्रद्धेची ॥ १३ ॥
गर्व अभिमान । क्रोध निष्ठूरता ॥
स्वहिता नेणता । असूरींचा ॥ १४ ॥
दैवी संपत्ती ती । मोक्षासी कारण ॥
बंधाचें निशाण । ती आसूरी ॥ १५ ॥

पार्थी तूज असे । दैवी संपद्योग ॥
ह्मणूनी उद्वेग । नको तुला ॥ १६ ॥
सर्व भूत सृष्टी । दैवी कीं आसूर ॥
दैवीचा विस्तार । पूर्वीं झाला ॥ १७ ॥
शुद्धता आचार । सत्यही नेणती ॥
तयास ह्मणती । असुर जन ॥ १८ ॥
जगतास नाहीं । ब्रह्म अधिष्ठान ॥
ईश्वरा वांचून । आहे सर्व ॥ १९ ॥
सृष्टी आपेंआप । होऊनी राहिली ॥
प्रकृती कोठली । पुरुष कैंचा ॥ २० ॥
ऐसे नष्ट चित्त । अल्प बुद्धी नर ॥
करीताती क्रूर-कर्मं लोकीं ॥ २१ ॥
अतृप्त कामाचा । आश्रय करून ॥
दंभ मदमान । वागवीती ॥ २२ ॥
भूमी आणि धन । हेंच ज्यांस मोठें ॥
तयांचें वोखटें । कर्म सदा ॥ २३ ॥

विषयाचा भोग । तयाचीच चिंता ॥
सत्कर्माची वार्ता । तेथें नाहीं ॥ २४ ॥
काम क्रोधाचे जे । गुलाम जाहाले ॥
पाशांत गुंतले । आशेच्या ते ॥ २५ ॥
नाना दुष्कृत्यांनीं । द्रव्य मेळवीती ॥
विषय भोगीती । असुर जन ॥ २६ ॥
हें मी मिळवीलें । साध्य तें करीन ॥
द्रव्य मिळवीन । बहु साल ॥ २७ ॥
द्वेष कर्त्यांस मी । मारीलें टिपून ॥
पालथे घालीन । शत्रू सर्व ॥ २८ ॥
मोठा मी भोक्ता मी । सुखी बलवान ॥
मी असें कुलीन । जातीवंत ॥ २९ ॥
यज्ञ मी करीन । दान मी देईन ॥
लोकां रंजवीन । परोपरी ॥ ३० ॥
नाना मनोरथें । चित्तीं भांबावलें ॥
मोहानें व्यापले । कामासक्त ॥ ३१ ॥

पाखंडी नास्तीक । ऐसे असुर जन ॥
नरक वतन । असें त्यांना ॥ ३२ ॥
ह्मणवीत मोठे । आपणा आपण ॥
दुर्गुणांची खाण । द्रव्यें मत्त ॥ ३३ ॥
अविधी पूर्वक । करीती यजन ॥
नरक साधन । असे त्यांचें ॥ ३४ ॥
ताठा बळ गर्व । काम क्रोधाश्रित ॥
भक्तांचा करीत । निंदा द्वेष ॥ ३५ ॥
द्वेष आणि निंदा । नव्हे ती भक्तांची ॥
हृदयासी डाची । माझी ह्मणुनी ॥ ३६ ॥
ऐशा अधमासी । घालीतों संसारीं ॥
लोटीतों आसूरी । वृत्तीमध्यें ॥ ३७ ॥
मूढ जन्मोजन्मीं । होऊनी राहती ॥
मी तयां दुर्गती । देतों नित्य ॥ ३८ ॥
काम क्रोध लोभ । नरकाचीं द्वारें ॥
ह्मणूनी माघारें । त्यांसी व्हावें ॥ ३९ ॥

नरकद्वारें टाकी । आचरे विहीत ॥
तोचि परम हित । पावतसे ॥ ४० ॥
कामासक्त जन । विधीतें पारखा ॥
स्वर्ग मोक्ष सुखा । अंतरतो ॥ ४१ ॥
भले बुरें काय । शास्त्र सांगतसे ॥
पार्था करी तैसें । योग्य कर्म ॥ ४२ ॥
ऐसें हें सोळाव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीयां धीर । पुढें ऐका ॥ ४३ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ४४ ॥

---

## अध्याय १७ वा.

अ०-शास्त्र बाह्य कर्मे । श्रद्धेनें करीती ॥
ती वृत्ती कोणती । देवा सांगे ॥ १ ॥
कृ०-ज्याचा जो स्वभाव । तैशी त्याची वृत्ती ॥
सांगतो त्या रीती । ऐके आतां ॥ २ ॥

सत्वांश सारखी । श्रद्धा उपजते ॥
वृत्तीही राहते । तैसी त्याची ॥ ३ ॥
सात्वीक देवाचें । भजन करीती ॥
राजस पूजीती । यक्षादिक ॥ ४ ॥
तामस पिशाच्च । वेताळ पूजीती ॥
देहांतीं पावती । त्याच रूपा ॥ ५ ॥
शास्त्र बाह्य तप । विषय प्रीतीनें ॥
बळेंच दंभानें । करीताती ॥ ६ ॥
येणें होतो पंच । भूतां मला शीण ॥
तो निश्चयें जाण । आसूरीच ॥ ७ ॥
जैसी ज्याची वृत्ती । तैसाची आहार ॥
आहेत प्रकार । त्याचे तीन ॥ ८ ॥
यज्ञ तप दान । त्यांतही त्या वृत्ती ॥
आढळून येती । तीन्ही रीती ॥ ९ ॥
पुष्टीकर देहा । मनासी उल्हास ॥
दृष्टीस रुचीस । बरा असे ॥ १० ॥

आरोग्यकारक । रुची वाढवीसा ॥
आहार हा ऐसा । सात्वीकाचा ॥ ११ ॥
कडू रुक्ष ऊष्ण । आंबट खारट ॥
राजसा तिखट । प्रीय बहु ॥ १२ ॥
उष्टें थंड शिळें । दुर्गंधीत अन्न ॥
तामसा भोजन । किळस न दे ॥ १३ ॥
न इच्छितां फळ । कर्तव्य मानून ॥
करीताती यज्ञ । तो सात्वीक ॥ १४ ॥
मनांत धरूनी । फळाचाच ध्यास ॥
होय तो राजस । यज्ञ पार्था ॥ १५ ॥
विधी अन्नदान । यज्ञ मंत्र हीन ॥
दक्षिणेवांचून । तो तामस ॥ १६ ॥
कायीक वाचीक । तप मानसीक ॥
कल्याण कारक । सांगतसें ॥ १७ ॥
देव द्विज गुरु । ज्ञात्यांचें पूजन ॥
शुद्ध तनु मन । हें कायीक ॥ १८ ॥

ब्रह्मचर्य बुद्धी । सर्वदां सरळ ॥
अहिंसा अढळ । हें कायीक ॥ १९ ॥
कोणा न दुखवी । सत्य प्रीय बोले ॥
जाण तप भलें । हें वाचेचें ॥ २० ॥
करीत सर्वदां । वेदांचें पठण ॥
तेंही तप जाण । वाणीचेंच ॥ २१ ॥
कोणाही विषयीं । प्रीति द्वेष नसे ॥
मन राखीतसे । सदा शांत ॥ २२ ॥
ऐशीं ही मानस । तपाचीं लक्षणें ॥
येणें खूण बाणे । अंतरींची ॥ २३ ॥
निष्काम आणीक । श्रद्धेनें जें केलें ॥
तप ह्मणीतलें । तें सात्वीक ॥ २४ ॥
आपण तपस्वी । दिसावें लोकांस ॥
मानाचा हव्यास । अंतर्यामी ॥ २५ ॥
दांभीक पणानें । तप आचरीती ॥
राजस ह्मणती । त्या तपासी ॥ २६ ॥

शरीर दंडून । तप करीताती ॥
सज्जन ह्मणंती । तें तामस ॥ २७ ॥
परासी द्यावया । दुःख आचरीती ॥
तें तप ह्मणती । तामसची ॥ २८ ॥
वस्तु दुसऱ्यासी । द्यावी हाच हेतु ॥
उसन्याचा किंतु । नसे मनीं ॥ २९ ॥
स्थळ काळ पात्र । पाहूनीयां दान ॥
करीताती जन । तें सात्वीक ॥ ३० ॥
उपकाराची फेड । करावयासाठीं ॥
किंवा फळासाठीं । कोणी देती ॥ ३१ ॥
वरी करी दान । अंतरीं त्रासून ॥
तें राजस दान । ह्मणवीतें ॥ ३२ ॥
अपवित्र दान । अपवित्र स्थळीं ॥
अपवित्र काळीं । तें तामस ॥ ३३ ॥
तिरस्कार युक्त । सत्कारा वांचून ॥
करीताती दान । तें तामस ॥ ३४ ॥

ओं तत् सत् हीं नांवें । आहेत ब्रह्माचीं ॥
सत्कर्मांत यांची ॥ व्हावी सई ॥ ३५ ॥
श्रद्धाहीन जें जें । यज्ञ तप दान ॥
करुन न करून । सारखेंच ॥ ३६ ॥
ऐसें हें सत्राव्या । अध्यायाचें सार ॥
ठेवोनीया धीर । पुढें ऐका ॥ ३७ ॥
कृपाघन पार्थ-सखा नारायण ॥
तयासी शरण । मयूर हा ॥ ३८ ॥

---

## अध्याय १८ वा.

अ०-न्यास संन्यास । या दोहोंचें वेगळें ॥
तत्व मसी कळे । ऐसें सांगे ॥ १ ॥
कृ०-काम्य कर्म त्यागा । संन्यास ह्मणती ॥
येणें जन धरिती । मोक्ष पंथ ॥ २ ॥
वेद विहित कर्म । फळाची न आस ॥
ह्मणती तयास । त्याग पार्था ॥ ३ ॥

कर्में दोष युक्त । ह्मणोनी टाकावीं ॥
कोणी तीं करावीं । ह्मणताती ॥ ४ ॥
त्यागावीशीं । माझा निर्णय सांगतों ॥
सावध ऐके तो । पुरुषश्रेष्ठा ॥ ५ ॥
यज्ञ दानादिक । कर्में न टाकावीं ॥
अवश्य करावीं । शुद्धीसाठीं ॥ ६ ॥
आसक्ती सोडून । फळहीं वर्जून ॥
करणें अनुष्टान । विहिताचेंच ॥ ७ ॥
कर्तव्य ह्मणूनी । कर्म आचरावें ॥
उत्तम जाणावें । हेंची मत ॥ ८ ॥
वेदविहित नित्य । कर्माचा जो त्याग ॥
तो तामस त्याग । ह्मणवीतो ॥ ९ ॥
देहा क्लेश ह्मणुनी । टाकी जो कर्मास ॥
तो होय राजस । त्याग पार्था ॥ १० ।
कर्तव्य ह्मणूनी । नित्य कर्में करी ॥
हेतु फळावरी । न ठेवीतां ॥ ११ ॥

ऐशीं कर्मं करी । परी न आसक्ती ॥
सात्वीक ह्मणती । त्या त्यागासी ॥ १२ ॥
नर न समर्थ । टाकावया कर्म ॥
फळत्याग वर्म । हें त्यागाचें ॥ १३ ॥
एक सौख्यकर । एक दुःखमूळ ॥
तीजें सर मिसळ । कर्मफळ ॥ १४ ॥
भलें बुरें तैसें । मिळे कर्मफळ ॥
टाकी कर्मफळ । तोची मुक्त ॥ १५ ॥
कर्माच्या सिद्धीला । कारणें हीं पाच ॥
ऐकूनी घे साच । सांगतसें ॥ १६ ॥
देह अहंकार । दैव पंचप्राण ॥
इंद्रियें हीं जाण । पांच असती ॥ १७ ॥
कोणत्याही कार्या । कारणें हीं पाच ॥
मीळती तेंव्हांच । कर्म घडे ॥ १८ ॥
हीं कारणें कार्या । असतां दुर्मती ॥
अंध ह्मणताती । आत्मा कर्त्ता ॥ १९ ॥

अहंकार नाहीं । फळेच्छाही नाहीं ॥
तो बद्धही नाहीं । कोण्या कर्मे ॥ २० ॥
करण कर्म कर्त्ता । कर्माचीं साधने ॥
त्यांचे गुण भेदानें । तीन भेद ॥ २१ ॥
सर्वत्र भरला । असे भगवान ॥
तोची हें बनून । राहिलासे ॥ २२ ॥
या ज्ञाना सात्वीक । सुज्ञ ह्मणताती ॥
भिन्न तेथें मती । तें राजस ॥ २३ ॥
क्षुद्र देवतादि । हाच माझा देव ॥
हा आहे प्रभाव । तामसीचा ॥ २४ ॥
वेद विहित नित्य । कर्मे चौवर्णाची
तीन प्रकारची । सांगतसें ॥ २५ ॥
फल इच्छा द्वेष । प्रीती कीं वासना
सात्वीक कर्माना । नसताती ॥ २६ ॥
कर्म कामनेनें । अहंकारें घडे ॥
श्रमानें तें मोडे । राजसांत ॥ २७ ॥

ज्याज्या रीती कर्मा । त्यारीती कर्त्यास ॥
सात्वीक राजस । तामसही ॥ २८ ॥
बुद्धि धारणेचे । होती तीन भेद ॥
त्रिगुणानें विशद । सांगू तुला ॥ २९ ॥
प्रवृत्ती निवृत्ती । आणि कार्याकार्य ॥
तैसें भयाभय । बंध मोक्ष ॥ ३० ॥
यांतें जाणणारी । सात्वीकी ती बुद्धि ॥
येणें भवांबुधी । आटतसे ॥ ३१ ॥
धर्माधर्म हेतु । आणि कार्य नेणें ॥
भलतेंच मानणें । ती राजसी ॥ ३२ ॥
अधर्मच धर्म । अज्ञानानें वाटे ॥
खरें वाटे खोटें । ती तामसी ॥ ३३ ॥
मन प्राणेंद्रियें । ब्रह्मची वाटती ॥
जाण धारणा ती । सत्व रूप ॥ ३४ ॥
धर्म अर्थ काम । ज्या मध्यें असती ॥
फळावरी प्रीती । ती राजसी ॥ ३५ ॥

फार निद्रा भय । शोक मोहमद ॥
बुद्धि होई मंद । ती तामसी ॥ ३६ ॥
सुखाचेही तीन । आहेत प्रकार ॥
ऐक तूं सादर । कुंतीपुत्रा ॥ ३७ ॥
ज्या सौख्यांत चित्त । अभ्यासें रमतें ॥
दुःख विरमतें । त्याच ठाई ॥ ३८ ॥
तें सुख सात्वीक । आधीं विषावाणी ॥
गोड परिणामीं । होत असे ॥ ३९ ॥
आत्मरूप बोध । बुद्धीस जैं कळे ॥
तेव्हांच बा मीळे । खरें सौख्य ॥ ४० ॥
इंद्रीय विषय । संयोगी जें सुख ॥
परीणामीं दुःख । तें राजस ॥ ४१ ॥
मोह रुजे रुचे ॥ आळस प्रमाद ॥
निद्रेचा आनंद । तें तामस ॥ ४२ ॥
स्वभावा सारखे । कर्माचे विभाग ॥
सांगतसें सांग । चौ वर्णांचे ॥ ४३ ॥

भगवंतीं निष्ठा । इंद्रिय निग्रह ॥
शुद्धी अंतर्बाह्य । विप्र कर्म ॥ ४४ ॥
विज्ञान आस्तिक्य । सदा सरळता ॥
ज्ञान कुंती सुता । विप्रकर्म ॥ ४५ ॥
पराक्रम तेज । धैर्य शूरपणा ॥
या आहेत खूणा । क्षत्रीयांच्या ॥ ४६ ॥
भगवंतीं भाव । दक्षपणें वागे ॥
क्षत्रीयांचीं अंगें । ही सहज ॥ ४७ ॥
शेती गौ रक्षण । व्यापार करणें ॥
हीं सर्व लक्षणें । वैश्य त्यांची ॥ ४८ ॥
सेवा जी करणें । तीनीही वर्णांची ॥
वृत्ती ही शूद्राची । स्वाभावीक ॥ ४९ ॥
आपापुल्या कर्मीं । जो मग्न राहतो ॥
तो सिद्धी पावतो । सर्वोत्कृष्ठ ॥ ५० ॥
सर्व चराचर । जाहला निर्माता ॥
स्वधर्में पूजीतां । तो दे मुक्ती ॥ ५१ ॥

परधर्म बरा । आचराया जरी ॥
तया न ये सरी । स्वधर्माची ॥ ५२ ॥
स्वभावज कर्म । जरी अमंगल ॥
तरी तें मंगल । करीतसे ॥ ५३ ॥
फळाची न इच्छा । कर्मीं न आसक्ती ॥
तो पावत मुक्ती । ज्ञानयोगें ॥ ५४ ॥
आत्मरूपीं करी । बुद्धी संयमन ॥
विषय त्यागून । एकांतांत ॥ ५५ ॥
सत्वान्न भक्षून । मन आवरून ॥
करीतसे ध्यान । वैराग्यानें ॥ ५६ ॥
कामादी सोडून । ममत्व रहीत ॥
वागे तोची होत । ब्रह्म रूप ॥ ५७ ॥
त्याचें चित्त सदां । प्रसन्नता धरी ॥
इच्छाही न करी । निवृत्तीची ॥ ५८ ॥
ऐसा ज्ञानी वागे । सर्वांभूतीं सम ॥
मद्भक्ती उत्तम । त्यासी लाभे ॥ ५९ ॥

तत्वता जाणतो । मी जसा जितूका ॥
अंती तो तितूका । मला मीळे ॥ ६० ॥
कर्मफल मला । अर्पण करावें ॥
मच्चित्त तूं व्हावें । बुद्धी योगें ॥ ६१ ॥
मच्चित्त तूं होतां । विघ्नें पळतील ॥
येरें लागतील । तुझ्या पाठीं ॥ ६२ ॥
स्वभावज कर्म । युद्ध न इच्छीसी ॥
धरूनी बैससी । जरी मोह ॥ ६३ ॥
स्वाभावीक कर्मे । असती तूं बद्ध ॥
युद्धालागीं सिद्ध । तेणें होसीं ॥ ६४ ॥
इश्वर राहोनी । सर्वांच्या अंतरीं ॥
भ्रमवी कर्मापरी । तो मायेनें ॥ ६५ ॥
जा शरण तया । देईल तो शांती ॥
मोक्षपद अंतीं । पावसी तूं ॥ ६६ ॥
सां[illegible]तलें तुला । गुह्य ज्ञान सारें ॥
वाटेल विचारें । तैसें करी ॥ ६७ ॥

अंतरीचें गुह्य । पुन्हां सांगूं तुला ॥
तू प्रीय मजला । ह्मणूनीयां ॥ ६८ ॥
मन माझ्या ठांई । चित्त माझ्या ठांई ॥
राखी माझा होई । पूजक तूं ॥ ६९ ॥
संप्रेमें मजला । वंदन करीसी ॥
मलाच मिळसी । सत्य सत्य ॥ ७० ॥
सर्वांठाई मीच । मानूनी राहसी ॥
करीन मी तूसी । बंधमुक्त ॥ ७१ ॥
नाहीं तप भक्ती । श्रवणाची आस ॥
गीता ज्ञान त्यास । सांगूं नको ॥ ७२ ॥
गीता ज्ञान माझ्या । भक्ता जो सांगेल ॥
तो मज पावेल । निःसंशय ॥ ७३ ॥
केलें ज्ञान यज्ञें । मानीन यजन ॥
करी जो पठण । हा संवाद ॥ ७४ ॥
श्रद्धायुक्त गीता । श्रवण करील ॥
तो मुक्त होईल । पापांतूनी ॥ ७५ ॥

माझा सर्व बोल । पार्थी तूं ऐकीला ॥
मोह तुझा गेला । किंवा नाहीं ॥ ७६ ॥
अ०–प्रसादानें तुझ्या । मोह माझा गेला ॥
आत्मबोध झाला । तुझ्या बोधें ॥ ७७ ॥
शिरीं धरूनीयां । आज्ञा मी हा सिद्ध ॥
करावया युद्ध । झालों आहें ॥ ७८ ॥
संजय–कृष्णार्जुन यांचा । संवाद जो झाला ॥
अद्भूत ऐकीला । राया सर्व ॥ ७९ ॥
श्रीगुरु प्रसादें । मी हा गुह्य योग ॥
कृष्ण मुखें सांग । ऐकीयेला ॥ ८० ॥
केशव अर्जून । यांचा हा संवाद ॥
अभ्दुत पुण्यद । धृतराष्ट्रा ॥ ८१ ॥
अभ्दुत तें रूप । संवाद स्मरूनी ॥
जातसें भरूनी । आनंदानें ॥ ८२ ॥
योगेश्वर कृष्ण । अर्जून हे जेथें ॥
राज्य लक्ष्मी तेथें । वासकरी ॥ ७३ ॥

वैभव शाश्वत । नीती वसे तेथें ॥
संपविला येथें । गीता ग्रंथ ॥ ८४ ॥
ऐसें अठराव्या । अध्यायाचें सार ॥
सेवीतां संसार । मावळेल ॥ ८५ ॥

---

## प्रार्थना.

आत्मारामें माझा । हेतु पुरविला ॥
भक्तिचा भूकेला । जगन्नाथ ॥ १ ॥
आनंद न माये । माझीया अंतरीं ॥
अश्रू नेत्रांतरीं । भरुनी आले ॥ २ ॥
प्रेमभारें होतों । राम पदीं लीन ॥
मयूर हा मीन । पादकमलीं ॥ ३ ॥
भक्तिनें हें कर्म । करीतों अर्पण ॥
रामरुपी कृष्ण । तुष्ट असो ॥ ४ ॥

समाप्त.

२२२

REFBK-0000222
REFBK-0000222

# पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

रा. रा. मोरो सदाशिव मराठे,
मु० राई ( भायंदर. )

" मोरेश्वर केशव केळकर;
नं. ३ गोरेगांवकर बिल्डिंग्ज, मुंबई.

" बाळकृष्ण लक्ष्मण पाठक, बुकसेलर;
मोतीबाजार, मुंबई.

" फाटक ब्रदर्स, बुकसेलर्स,
ठाकुरद्वार रोड, मुंबई.

" पुरंदरे आणि कंपनी, बुकसेलर्स;
माधवबाग, मुंबई.

" परचुरे, पुराणिक आणि कंपनी;
बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई.

" म्यानेजर "पैसा फंड" ऑफिस,
केदावजी नायकाची चाळ, मुंबई.

मालक, विजय छापखाना—माधवबाग, मुंबई.